
# पक्षिमित्र



संमेलन विशेषांक १९९३

## शुभेच्छा



१२ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलननिमित्त निसर्ग सेवा संघ या संस्थेच्यावतीने एक स्मरणिका प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद वाटला. महाराष्ट्रभर विखुरलेल्या, एकाकी धडपणाऱ्या पक्षिमित्रांना एका व्यासपीठावर एकत्र आणण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाने एक तपाची वाटचाल पूर्ण केली आहे ही समाधानाची बाब आहे. पर्यावरण संतुलन राखण्याच्या दृष्टीने निसर्ग सेवा संघ महत्वपूर्ण कार्य करीत आहे. पक्षीजीवन समृध्द होण्याच्या दृष्टीने ते उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. या कार्यात माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

(शरद पवार)
माननीय मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

# आशिर्वचन

नागपूरच्या पहिल्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनात विदर्भातील पक्षिमित्र चळवळ संघटीत करण्याच्या हेतून 'विदर्भ पक्षीमित्र मंच' अस्तित्वात आला. मंचाची रचना तथा जबाबदारी यात स्वाभाविकच निसर्ग सेवा संघाचा सिंहाचा वाटा अभिप्रेत होता. मंचाच्या प्रारंभिक काळात एका अर्थाने पालकत्व आम्ही जाणीव पूर्वक स्वीकारले आहे. याच जाणीवेतून १२ व्या पक्षिमित्र मंचाच्या निसर्ग सेवा संघाच्या स्मरणिकेचे रुपांतर 'पक्षिमित्र' च्या प्रथम वार्षिकांकात करण्याची विदर्भ पक्षिमित्र मंचाची विनंती आम्ही मान्य केली. १२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनातील पक्षिमित्र चळवळीसाठी संकलित निधीतून ठोस आर्थिक योगदान करण्याच्या निसर्गसेवा संघाच्या आश्वासनाची अशाप्रकारे पूर्ती होत आहे याचे आम्हाला विशेष समाधान वाटते.

विदर्भातील पक्षिमित्र चळवळीच्या विकासाची बांधिलकी निसर्ग सेवा संघाने स्वीकारली आहे. यासाठी स्थापन झालेल्या विदर्भ पक्षिमित्र मंचाला सर्व तो परि सहाय्य करण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत.

'पक्षिमित्र' वार्षिक पक्षिमित्र चळवळीच्या विकासात मौलिक योगदान देईल असा विश्वास वाटतो. 'पक्षिमित्र' ला निसर्ग सेवा संघ तथा माझ्या व्यक्तीशः हार्दिक शुभेच्छा तथा आशिर्वचन !

सी. एस. किरपेकर

१ डिसेंबर ९३ (सी.एस. किरपेकर)

नागपूर मा. अध्यक्ष, निसर्ग सेव संघ.

वर्ष १ ले

अंक १ ला

# पक्षिमित्र

विदर्भ पक्षिमित्र मंच वार्षिक - संमेलन विशेषांक

**संपादन**
अजय डोळके

**सहाय्यक**
रजनी डोळके
अनुराधा लाडखेडकर

**सजावट**
श्री नरेन्द्र धारे

**प्रबंधन**
रमेश लाडखेडकर

## अंतरंग

### पक्षिमित्र संमेलन


संपादकीय १
पक्षिमित्र चळवळ सिंहावलोकन २
एका तपाची वाटचाल - ३
१२ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन नागपूर संयोजन - संकल्पना
मनोगत : (i) चंद्रशेखर धर्माधिकारी ४
(ii) स्वागत अध्यक्षांचे मनोगत ५
१२ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन नागपूर - संक्षिप्त अहवाल ६
महाराष्ट्र पक्षिविश्वाचा सर्वंकष अभ्यास - आराखडा ८
महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन मध्यवर्ती समिती - अहवाल १०
विदर्भातील पक्षिमित्र चळवळ - मागोवा १२
स्पंदने १६
गोमांतक संमेलन २३


### विशेष लेख


पक्षिअभ्यास एक संकल्पना - प्रकाश गोळे २४
पक्षीनिरीक्षण आणि ज्ञानेश्वरी - श्री वासुदेवराव चोरघडे २७
नागपूर परिसरात तुरेवाला मोठा दाबचिक - रमेश लाडखेडकर ३२


### निसर्ग सेवा संघ


निसर्ग सेवा संघ - परिचय ३६
विदर्भ नॅचरल हिस्ट्र स्टडी सेंटर - एक कल्पना - प्रकाश गर्दे ३७
पर्यावरण चळवळीत निसर्ग सेवा संघाचे योगदान - दामोदर द. झाडे ४१



**प्रकाशक निसर्ग सेवा संघ यांनी विदर्भ पक्षीमित्र मंचासाठी "पक्षीमित्र" सिंक्रॉन कॉम्प्युटर कडून टाईपसेट करून व ऋचा प्रिंटर्स येथे छापून नागपूरला प्रकाशीत केले.**

# संपादकीय

'पक्षिमित्र' चा प्रथम अंक आपल्या हाती देतांना आम्हाला हार्दिक आनंद होतोय. खर तर 'पक्षिमित्र' ची कल्पना अचानक पुढे आली. विदर्भाच्या व्दितीय संमेलनाची पूर्व तयारी करतांना विदर्भ पक्षिमित्र मंचाची सुनिश्चित बांधणीही घडत होती. अशावेळी विदर्भ पक्षिमित्र मंचाचे मुखपत्र असावे हे तीव्रतेने जाणवू लागले. त्यातून 'पक्षिमित्र' ची संकल्पना जन्मली. निसर्ग सेवा संघाच्या वतीने प्रकाशित होऊ घातलेला १२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाची स्मरणिका आम्ही अंतीम टप्यात आणली होती. या स्मरणिके चे रुपांतर 'पक्षिमित्र' मधे करता येईल का ? असा विचार आला. तशी निसर्ग सेवा संघाला आम्ही गळ घातली आणि उदार मनाने त्यांनी स्मरणिका आम्हाला दान केली. मग झपाटयाने काही फेरफार करुन आम्ही 'पक्षिमित्र' घडविला. 'पक्षिमित्र' च्या संमेलन विशेषांकाचे स्वरुप म्हणूनच काही-से स्मरणिकेचे ही आहे. पण 'पक्षिमित्र' चा पहिला अंक आपल्या हाती देतांना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. पक्षिमित्र चळवळीला वाहिलेल्या 'पक्षिमित्र' चे आपणही हार्दिक स्वागत कराल असा विश्वास बाळगतो.

संमेलन विशेषांकात प्रामुख्यसाने १२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचा व मध्यवर्ती समितीच्या वर्षभरातल्या प्रारंभिक धडपडीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलाय. या वर्षात विदर्भात पक्षिमित्र चळवळ जोमाने उभरतेय या धडपडीचेही चित्र मांडण्याचा आम्ही प्रयत्न केलाय. महाराष्ट्रात पक्षिमित्र चळवळीने एक तप पूर्ण केलय. या दरम्यान चळवळीच्या मुख्य प्रवाहाशी बांधिलकी असमणाऱ्यांची 'स्पंदने' टिपण्याचाही प्रयत्न केलाय. नवगतांसाठी ते उपयुक्त ठरावे.

श्री वासुदेवराव चोरघडे यांचे चिंतन, श्री प्रकाश गोळे यांचे प्रत्यक्ष अभ्यासार्थ आवाहन, तुर्रेबाज पाणडुबीच्या प्रथम दर्शनावरची श्री. रमेश लाडखेडकरांची एक जुनी नोंद अशी भविष्यातील अंकाची दिशा दर्शविण्यापुरती सामुग्रीच वेळेच्या मर्यादेमुळे अंकात घालता आली आहे. वास्तविक पक्षांप्रमाणेच 'पक्षीमित्र' साठी आकाश हीच मर्यादा आहे. भविष्यात त्या दिशेने झेप घेण्याचा प्रयत्न राहील.

हा अंक निसर्ग सेवा संघामुळेच विदर्भ पक्षी मित्र मंचाला प्रकाशित करता आलाय. आम्हाला आधारभूत असलेल्या निसर्ग सेवा संघाच्या कामाची दिशा स्पष्ट करणारी संक्षिप्त माहिती आवर्जून अंकात घातली आहे. निसर्ग सेवा संघाच्या ऋणातून मुक्तहोण्यासाठी हे पुरेसे नाही याची जाणीव आम्हाला आहे.

पक्षिमित्रांच्या 'पक्षिमित्र' या अंका विषयीच्या प्रतिक्रीया जाणुन घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

अजय डोळके

संपादक 'पक्षिमित्र'

# पक्षिमित्र चळवळ सिंहावलोकन



"महाराष्ट्रातल्या पक्षिमित्र चळवळीने एका तपाची वाटचाल पूर्ण केली आहे. या निमित्ताने 'पक्षिमित्रां'चे सिंहावलोकन करण्याचा प्रयत्न केलाय. १२ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन व मध्यवर्ती समितीने केलेला पाठपुराव्याचा प्रयत्न यांच्या वर्तमानाला स्वाभाविकच प्राधान्य दिले आहे. 'वाटचाल' आणि 'स्पंदना' तून चळवळीच्या अंतरंग प्रवाहाचा वेध घेण्याचा प्रयत्न आहे. तर प्रमुख अतिथी व स्वागताध्यक्षांच्या मनोगतातून सामान्यजनांच्या संमेलन चळवळीकडूनच्या अपेक्षा नोंदविल्या आहेत. एकूणच 'सिंहवलोकन' हे पक्षिमित्र चळवळीचे एक प्राथमिक रेखाटन आहे."

संपादक



## एका तपाची वाटचाल

महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाच्या धडपडीचे यंदा एक तप पूर्ण होतय याचा आपण सर्वानाच अभिमान आहे. पक्षिमि
सर्वश्री प्रकाश गोळे यांच्या पुढाकारान ८१ साली या धडपडीला प्रारंभ झाला तो लोणावळयात. नंतर, नागपूर, कोल्हापूर
सोलापूर, औरंगाबाद, नाशिक, पुणे, बीड पुणे, मालवण व हरिहरेश्वर असा अखिल महाराष्ट्राचा प्रवास करीत यंदा बारावे
पक्षीमित्र संमेलन नागपूर मुक्कामी पोहचले आहे.

महाराष्ट्रभर विखुरलेल्या, एकाकी धडपणाऱ्या पक्षीमित्रांना एका व्यासपीठावर एकत्र आणण्यासाठी मुळात महाराष्
पक्षीमित्र संमेलनाचा आरंभ झाला होता. प्रतिवर्षी मित्रांचे स्नेहमीलन घडावे, पक्षीनिरीक्षणातील परस्परांच्या अनुभवांचं
देवाणघेवाण व्हावी, तज्ञांचे अनौपचारिक मार्गदर्शन मिळावे. आणि सामूहिक पक्षीनिरीक्षणाचा मनसोक्त आनंद घ्यावा अश
'माफक अपेक्षांचे मित्र मिळावे' असे आरंभीच्या संमेलनाचे स्वरुप होते. आज महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाच्या सीम
विस्तारल्या आहेत. पण संमेलन आयोजनातली अनौपचारिकता टिकविण्याचा आयोजकांचा आग्रह आजही कायम आहे.

पक्षीमित्र संमेलनाच्या आजवरच्या प्रवासात काही परिवर्तने घडवायचा प्रयत्न झाला, प्रयत्न असे होते.

* महाराष्ट्रातील पक्षीजीवनाच्या पर्यायाने निसर्गाच्या अभ्यासाला मातृभाषा मराठीतून चालना मिळाली.
* पक्षीनिरीक्षकांना पक्षीजीवनाच्या शास्त्रीय अभ्यासासाठी प्रवृत्त करावे.
* मराष्ट्रातील पक्षी तथा विविध पक्षीअधिवास (अरण्ये, माळराने तथा पाणवठे) यांचे संरक्षण तथा संवर्धन याकडे शासन तथा समाजाचे लक्ष वेधावे.
* 'पक्षीदिन' आयोजना-सारख्या सुदृढ प्रथा महाराष्ट्रात रुजवाव्या.

## १२ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन नागपूर संयोजन- संकल्पना

महाराष्ट पक्षी मित्र संमेलनाला आता एका व्यापक चळवळीत रुपांतरीत करण्याची गरज आहे अशी आमची धारण
आहे. म्हणून पाठपुराव्याच्या ठोस उपक्रमांच्या आखणीवर चर्चासत्रात विशेष भर राहील. महाराष्ट्रातील पक्षीजीवनाच्य
शास्त्रीय अभ्यासाची दिशा, संमेलनात युवकांचा सहभाग वाढविण्यासाठीचे उपक्रम, विभागीय पक्षीमित्र संमेलनांचे आयोज
तथा महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनार्थ राजव्यापी संपर्क व्यवस्था अथवा संघटन निर्मितीच्या प्रक्रियेला चालना इत्यादी विषयांव
निर्णायक चर्चा घडविण्याचा संकल्प आहे. 'शहरांमधील पाणवठयांची सद्यस्थिती' या विषयावर एक स्वतंत्र सत्र होईल
पक्षीनिरीक्षण चर्चासत्र, स्लाईडस् तथा फिल्म शो असे नित्याचे संमेलनाचे स्वरुप राखल्या जाईल.

महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन एक तप पूर्ण करुन एका नव्या पर्वात प्रवेश करीत आहे. या निमित्ताने अखि
महाराष्ट्रातील आपण सर्व नवे जुने पक्षी मित्र मोठया संख्येने एकत्र येऊ या.

# मनोगत

संयोजक, १२ वे महाराषट्र पक्षिमित्र संमेलन

यांसी स.न.वि.वि.

मी कबूल करुन व इच्छा असूनही कार्यक्रमाला उपस्थित राहू शकत नाही, या बद्दल क्षमा करावी. येणे अशक्यच झाले. नाईलाज आहे. याचा अर्थ असा की, मी तुमच्या सोबत शरीराने नसलो तरी मनाने तुमच्या समारंभास हजर आहे. आणि हे आपणांस अधिक मोलाचे वाटावे.

पक्षीमित्र संमेलन हे खऱ्या अर्थाने पक्ष्यांपेक्षाहि माणसाच्या दृष्टीने अधिक महत्वाचे आहे. कुटुंब केवळ माणसाचे नसते. त्यात जोवर पशु-पक्षी सामील होत नाहीत तोवर कुटुंबाला पूर्णत्व प्राप्त होत नाही. निसर्गासोबत जगणे हयालाच कौटुंबिक भावना म्हणतात. म्हणूनच घरासमोर बगीचा हवा असतो. अशक्यच झाले तर कमीत कमी तुळशीचे झाड तरी असावे असे वाटते. पक्षी व निसर्ग हे एक प्रक्षेपण केन्द्र आहे. तेथून सतत संदेश प्रक्षेपित होत असतात, लहानमुले सुध्दा 'चिऊ-काऊ ' च्या गोष्टीच नव्हे तर त्यांच्या आवाजाने, बोलण्याने बोलायला शिकतात. पक्षी-शिवायचे जग अगदी निरस आणि बेचव ठरेल. पक्ष्यांना मित्र मानूनच आपण निसर्गाशी नाते प्रस्थापित करु शकू. यामुळे निसर्ग व माणूस यांचे सहजीवन व अनोखे नाते ही प्रस्थापित होईल.

आज माणसाने स्वार्थापोटी निसर्गाचेही शोषण चालविले आहे. आपण ते थांबविण्यासाठी ठोस पाऊले उचलीत आहोत. हा कार्यक्रम केवळ सरकार अगर सरकारी अधिकारी यांच्या भरवश्यावर राबविता येणार नाही. आचार्य विनोबा म्हणत त्याप्रमाणे जे पूर्णतः सरकारी असते ते 'असरकारी' म्हणजे परिणामकारक नसते. यांत जनतेचा सहभाग आवश्यक आहे. पक्षीमित्र होणे हे फार मोठे अध्यात्मिक मूल्य आहे. मैत्री इतके निरपेक्ष काहीच नसते. केवळ पक्ष्यांचा वध थांबविणे पुरेसे नाही. त्यांचे जतन व संवर्धन व्हावे लागेल. या पुढे औद्योगिक विकासाचे धोरण ठरवितांना नैसर्गिक समतोल कायम ठेवण्यावर भर द्यावा लागेल. एरवी 'विकास' भकासवाणा ठरेल. विकासाच्या प्रक्रियेत पक्षी आणि निसर्ग यांनाही सामील करुन घ्यावे लागेल. यासाठी केवळ बांधिलकी पुरेशी नाही. प्रत्यक्ष सामीलकी लागेल. विश्वाशी एकरुपता अनुभवण्याचा हा पुण्य संकल्प आहे. या साठी आपण ठोस पाऊले उचलीत आहोत. माझ्या अनंत शुभेच्छा । मी आपल्या संमेलनास सुयश चिंतितो ।

सर्व 'पक्षीमित्रांचे' हार्दिक अभिनंदन ।

नागपूर.

ता. १८ . २ . ९३

स्नेहाकांक्षि

न्यायमुर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी

प्रमुख अतिथी

# मनोगत

सर्वप्रथम महाराष्ट्राच्या मानचित्राला आणि पक्षीमित्रांचे प्रेरणास्थान असलेल्या पै. डॉ. सलीमअलींच्या प्रतिमेला अभिवादन! समारंभाचे मा. अध्यक्ष श्री. मारुती चितमपल्ली, १२ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाचे उद्घाटक श्री. राम इंदुरकरजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्री. रमेश बिडवे, निसर्गसेवा संघाचे अध्यक्ष श्री. चिंतामणराव किरपेकरजी, उपस्थित सन्माननीय नागरिक बंधू भगिनी तथा महाराष्ट्रभरातून एकत्र आलेले पक्षीमित्र. साऱ्यांचे हार्दिक स्वागत!

निसर्ग सेवा संघाने पुढाकार घेवून १२ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाच्या आयोजनाची धडपड सुरु केली. या धडपडीत नागपुरातील विविध संस्थांचा सक्रीय सहयोग त्यांना मिळाला. त्यातून निर्माण झालेल्या संयोजन समितीचा अध्यक्ष या नात्याने आपणा सर्वांचे स्वागत करतांना मला मनापासून आनंद होत आहे. कारण गेल्या दोन महिन्यांच्या आमच्या सहकाऱ्यांच्या अथक परिश्रमातून संमेलनाचे हे स्वप्न पूर्ण रुप धारण करीत आहे. संमेलन व्यवस्थेत राहून गेलेल्या त्रुटीबद्दल क्षमाशील राहून पक्षीमैत्री तथा परस्पर मैत्री साधणारे हे संमेलन आपण यशस्वी कराल असा विश्वास वाटतो.

नागपूर महानगराच्या सामान्य नागरिकांच्या वतीने आम्ही आपले स्वागत करीत आहोत. मध्यभारतातल्या निसर्गसमृध्द परिसरातील नगराला गौरवपूर्ण ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. मुळात ही गोंड राजांची व नंतर भोसल्यांची वैभवशाली राजधानी होती. नंतरच्या विकासाच्या प्रक्रियेत या शहराला अस्ताव्यस्त कॉक्रीटच्या जंगलाचे स्वरुप आज प्राप्त झाले असले तरी या परिसराच्या मूळच्या निसर्गसुंदर परिसराचे काही अलंकार या शहरात अद्यापही विदयमान आहेत. हे शहर एक हिरवे शहर आहे. नागनदी व पिलीनदी या दोन नद्यांच्या उगमांच्या पाणलोट क्षेत्रात वसलेल्या या महानगरात दहा भोसलेकालीन तलाव होते. अद्यापही त्यातले काही पाणवठे टिकून आहेत. हजारो स्थलांतरीत पक्षांना ते प्रतिवर्षी आकर्षित करीत असतात. त्यांचे आम्ही सहर्ष स्वागत करीत असतो. आज आपलेही 'मध्यभारतीय अरण्यांचे प्रवेशव्दार' असलेल्या व सुमारे सव्वादोनशे जमातींच्या पक्षांचे निवासस्थान असणाऱ्या या नगरातर्फे हार्दिक स्वागत!

अपर पॅलियोलिथीक कालखंडात शहामृगांचे वसतीस्थान असलेला विदर्भ हा परिसर आहे. आजही महाराष्ट्रात दुर्मिळ असणारे सारस, माळढोक, तणमोर आणि कदाचित जॉर्डन्स कोर्सर आदिंना निवारा देणारा हा परिसर आहे. असा या वैशिष्टपूर्ण पक्षी अधिवासात, विदर्भात आपले हार्दिक स्वागत!

नागपूर, विदर्भ किंबहूना महाराष्ट्राच्या सामान्य नागरिकांचा प्रतिनिधी या नात्याने मी आपणा समोर स्वागतार्थ उभा आहे अशावेळी सामान्य जनांच्या संमेलनाकडून असणाऱ्या काही अपेक्षा ही व्यक्त करणे उचित होईल.

१. आदिमानवाच्या जन्मापासून माणूस व पक्षी यांचे सहअस्तित्व राहिले आहे. मानवी जीवनाच्या विविध अंगाना पक्षी विश्वाच्या या सहसंबंधाने प्रभावित केले आहे. त्यामुळे पक्षीविषयक पारंपरिक ज्ञान समाजाच्या विविध स्तरात व्यक्त अव्यक्त स्वरुपात विखुरले आहे. किमान महाराष्ट्रातील हे परंपरागत ज्ञान संग्रहित व संस्कारित करुन लोकांपुढे मांडण्याची प्रक्रिया संमेलनाने सुरु करायला हवी.

२. गेले शतकभर पक्षी विषयक शास्त्रीय अभ्यास झाला आहे. मोजक्या शासकीय तथा असाशासकीय संस्थाच्या संग्रही ही माहीती तुंबून पडली आहे. महाराष्ट्र पक्षी मित्र संमेलनाने हे बंदिस्त ज्ञान मुक्त करुन मातृभाषा मराठीतून महाराष्ट्र समाज भूमीत सर्वदूर पोचविण्याचा वसा घ्यावा.

३. विविध शासकीय विभाग, अथवा लोकप्रतिनिधी, सामान्य जनता तथा पक्षी अभ्यासक यांच्या दरम्यान परस्पर संपर्काचा मोठा अभाव आहे. महाराष्ट्र पक्षी मित्र संमेलनाने या सर्व घटकांमध्ये समन्वय घडवून पक्षीअधिवासांच्या संरक्षण तथा संवर्धनार्थ दीर्घकालीन योजना तथा कार्यक्रमांची रचना करावी.

४. मध्यप्रदेश तथा गोव्याच्या सहभागीचे विशेष स्वागत करुन आता यापुढे दुसऱ्या तपात महाराष्ट्र पक्षी मित्र संमेलन हे खऱ्याअर्थाने बृहन् महाराष्ट्र पक्षी मित्र संमेलन व्हावे ही अपेक्षा.

सामान्य जनांच्या या मोजक्या अपेक्षांचा पुष्पगुच्छ अर्पण करुन मी स्वागताचे स्वगत संपवितो.

गिरीश गांधी
स्वागताध्यक्ष,
१२ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन

# १२ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन नागपूर.

## संक्षिप्त अहवाल

८१ साली लोणावळयाच्या अनौपचारिक पक्षी-मित्र शिबीरातून सुरु झालेल्या संमेलन चळवळीचे एक तप पूर्ण होतय. या पार्श्वभूमिवर नागपूरच्या १२ व्या पक्षीमित्र संमेलनाचे आयोजन झाले. मागल्या, हरीहरेश्वर संमेलनाच्या तुलनेत सहभागी पक्षीमित्रांची संख्या सात आठ पटींनी वाढली होती. त्यामुळे स्वाभाविकच उत्सवी उधाणात संमेलनाचा शुभारंभ झाला. संमेलनाध्यक्षपद पुण्याचे अनुभवी पक्षी अभ्यासक डॉ. श्री. रमेश बिडवे यांनी भूपविले. महाराष्ट्र राज्याचे मुख्य वनसंरक्षक (वन्यप्राणी) श्री. राम इंदुरकर यांनी उद्घाटन केले. समारंभाचे अध्यक्षस्थानी श्री. मारुती चितमपल्ली होते. विदर्भाच्या वतीने महाराष्ट्रभरातील पक्षी मित्रांचे स्वागत स्वागताध्यक्ष विदर्भ वनराईचे विश्वस्त श्री. गिरीश गांधी यांनी केले. बी.एन.एच.एस. च्या सेवेतून निवृत्त झालेल्या ज्येष्ठ पक्षीमित्र श्री. व्ही.सी.आंबेडकर यांचा निसर्गसेवा संघ नागपूर यांच्या वतीने "निसर्ग सेवा" पुरस्कार देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला. तेंव्हा वातावरण आनंदाने भरुन आले. महाराष्ट्रातील पक्षीमित्रांच्या परिवारीक स्नेह मिलनाचे रुप संमेलनाला आले.

दोन दिवस मग पक्षी मित्रांचे हे परिवारीक स्नेहमीलन असेच हसत खेळत क्वचित रुसत फुगत चालू राहिले. २२ व २३ फरवरी च्या नागपूरच्या गुलाबी थंडीच्या सकाळी पक्षीमित्रांनी तलावाच्या परिसरात पक्षी निरीक्षणाचा आनंद लुटला. सर्वांनी ११ ची संध्याकाळ संमेलनाच्या औपचारिक कार्यक्रमातून सुटी घेऊन श्री. सुरेशचंद्र वारघडे यांच्या "निसर्गपुत्र" या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने घडवून आणलेल्या निसर्गपुत्र श्री. माधवराव पाटील यांच्या सत्कारच्या आनंद सोहळ्यात घालवली. त्याच रात्री श्री. प्रकाश गोळे यांनी पक्षी मित्रांना सैबेरियन क्रौंचाच्या जन्मभूमिची अविस्मरणीय सफर पारदर्शिकांच्या साहाय्याने घडविली. या वर्षापूर्वीच्या संमेलनात याच सभागृहात क्रौंच पक्षांची जगाची सफर आय.सी.एफ. चे अध्यक्ष जॉर्ज आर्चिबाल्ड यांनी घडविली होती. त्याची आठवण झाली. आज या आंतरराष्ट्रीय क्रौंचसंरक्षण धडपडीत महाराष्ट्राच्या प्रकाश गोळेंनी आपला ठसा उमटविल्याचे जाणविले, छान वाटल. आजचे त्यांचे व्याख्यान हा जणु या संमेलनाचा सुवर्ण कळस होता.

संमेलनात वेळेअभावी दीर्घ असली तरी, दोनच चर्चासत्रे होऊ शकली. प्रथम सत्र "महाराष्ट्रातील पक्षी विश्वाचा सर्वंकष अभ्यास" या विषयावर आयोजित होते. खरतर निवडक अनुभ्वी पक्षीमित्रांना विषयाचे संक्षिप्त टिपण पूर्वसूचनेसहीत मिळाले होते. नेमक्या मुद्यांवर त्यांनी आपापले प्रास्ताविक मांडावे अशी अपेक्षा होती. त्यातून नव्या पक्षी निरीक्षकांचे प्रबोधनही झाले असते व दर्जेदार शास्त्रीय चर्चाही झाली असती. प्रत्यक्षात हा हेतु पुरेसा सफल होऊ शकला नाही. मात्र सर्वांना समाधान देणारी मांडणी केली प्रा. स्वाती गोळे यांनी ! महाराष्ट्राची भौगोलिक रचना, त्यानुसारच्या विभिन्न पारिस्थितीक व्यवस्था, पक्षी अधिवास व विविधतापूर्ण पक्षी जीवन या विषयाची सोपी, शास्त्रीय मांडणी करुन त्यांनी सुरेख चर्चा घडवून आणली. परंपरागत भारतीय वाङ्मयातली पक्षी विषयक माहीती देऊन श्री. मारुती चितमपल्ली यांनी प्रबोधन केले. अखेरीस श्री. प्रकाश गोळे यांनी पक्षांच्या गटनिहाय अभ्यासा विषयीचे एक माहीतपूर्ण टिपण सादर केले.

दुसरे सत्र २३ फरवरीचे म्हणजेच समारोपाचे सत्र होते. भरपूर कामकाज कमी वेळात पूर्ण करायचे होते. कारण भोजनानंतर नवेगाव, नागझिऱ्यासाठी सहल प्रस्थान करणार होती. या कसोटी पूर्ण सभेचे समर्थ सूत्रसंचालन संमेनाध्यक्ष डॉ. श्री. रमेश बिडवे यांनी केले. खालील महत्त्वाचे निर्णय या सत्रात घेण्यात आले.

**(अ) केन्द्रीय समिती**

येत्या वर्षाकरीता महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाला दिशादर्शन करण्यासाठी राज्य पातळीवरील समिती गठीत करण्यात आली. १२ व्या संमेलनाच्या पाठपुराव्याच्या उपक्रमांची जबाबदारी समितीने स्वीकारली. समितीची यंत्रणा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली.

अध्यक्ष : डॉ. रमेश बिडवे संयोजक : श्री. रमेश लाडखेडकर

**विभागीय प्रतिनिधी :** श्री. अजय डोळके, (विदर्भ), श्री. नितिन मोघे, (पुणे), श्री. दिगंबर गाडगीळ, (नाशिक) श्री अमरसिंह परदेशी, (औरंगाबाद), श्री. सुनील करकरे, (कोल्हापूर), श्री. नरेन्द्र गायकवाड, (सोलापूर) डॉ. श्री. सुधाकर कुऱ्हाडे, (नगर), श्री. अजयकुमार. ग्रामोपाध्ये (गोवा) .

**(आ) संमेलन पाठपुराव्याचे उपक्रम**

१) १३ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाची पूर्वतयारी - स्थान तथा स्वरुप निश्चित करणे.

२) विभागीय पक्षी मित्र संमेलन घडवून संमेलनाचा अहवाल विभागीय प्रतिनिधीने केन्द्रीय समितीला पाठविणे.

३) महाराष्ट्रातील अधिकाधिक पक्षीमित्रांना संमेलनाच्या मंचावर एकत्र आणण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रथ पक्षीमित्र व्यक्ती तथा संस्था यांची विभागीय सूचि विभागीय प्रतिनिधींनी संयोजकांकडे पाठवावी.

४)"महाराष्ट्रातील पक्षी विश्वांचा सर्वकष अभ्यास" या प्रकल्पाला केन्द्रीय समितीने अंतीम रुप देऊन आयोजन चालना द्यावी.

५) संपूर्ण महाराष्ट्राची मराठी पक्षीसूचि संकलित होण्याची गरज लक्षात घेऊन विभागीय प्रतिनिधीच्या माध्यमात् विभागीय पक्षीसूचि संकलीत करण्याच्या उपक्रमाला केन्द्रीय समितीने प्राधान्य द्यावे.

६) महाराष्ट्राच्या पाणपक्षी गणनेच्या (हिवाळी) प्रकल्पास सहयोग देण्याच्या कार्यात केन्द्रीय समितीने पुढाक घ्यावा.

७) डॉ. सलीमअलींचा जन्मदिवस म्हणजेच **"पक्षीदिन"** या संकल्पनेचे श्रेय महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाचे आहे म्हणून **"पक्षीदिन"** ला राष्ट्रीय मान्यता तथा शासकीय समर्थन प्राप्त करुन देण्यासाठी आणि १९९६ सालच्या पै. डॉ. सली अली यांच्या जन्मशताद्बीच्या उपक्रम आखणीसाठी राज्यस्तरावरील पक्षीदिन आयोजन समिती केन्द्रीय समितीने स्थाप करावी.

**(इ) महाराष्ट्र शासनासाठी ठराव तथा शिफारशी - पाठपुरावा**

१) महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाने प्रस्तावित केलेला महाराष्ट्र राज्य पक्षी खंडया (व्हाइट ब्रेस्टेड किंगफिशर) य पक्षाला राज्यपक्षी घोषीत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करावा.

२) महाराष्ट्रातील पक्षी अधिवासांचे (हॅबिटॅट) रक्षणाकडे राज्यशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विशेष प्रयत्न करावे य संदर्भात पक्षांच्या दृष्टीने महत्वाच्या जलमय भूमिंना (वेटलॅण्ड) अग्रक्रम द्यावा.

३) नागपूरच्या सोनेगाव तलावाच्या संरक्षणार्थ सुरु असलेल्या सोनेगाव तलाव बचाओ समितीच्या प्रयत्नांना हार्दि समर्थन तथा सक्रीय सहयोग द्यावा. यासाठी शासनाकडे पाठवायचे ठराव तथा शिफारसी यांना केन्द्रीय समितीच्या बैठकी अंतीम रुप दिल्या जावे.

**(ई) संमेलन मूल्यांकन**

१) गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन चळवळीतील उतसाह ओसरत असल्याचे जाणवू लागले आहे ११ व्या हरीहरेश्वर पक्षीमित्र संमेलनातील उपस्थितीने नीच्चांक गाठला होता. या तुलनेत नागपूर संमेलनातील पक्षी मित्रांच प्रतिसाद सुधारला पक्षीमित्रांना संमेलनात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केल्यास यश मिळू शकते हे यातुन स्पष्ट झाले.

२) महाराष्ट्र संमेलनाला जोडून यंदा विभागीय (विदर्भ) संमेलनाचेही आयोजन झाले. त्यामुळे विदर्भातील सहभागाच्य संख्येत वाढ झाली तसेच वैदर्भिय पक्षीमित्रांना महाराष्ट्र संमेनाचे "एक्सपोजर" मिळाल्यामुळे विदर्भातील पक्षीमि चळवळिला नवी चालना मिळाली. अशी जोड संमेलने संमेलन चळवळीच्या विकासाला लाभकारक ठरतील.

३) "महाराष्ट्रातील पक्षीविश्वाचा सर्वकर्ष अभ्यास" या विषयाच्या चर्चासत्रातील अनुभवावरुन शास्त्रीय अभ्यासाच्य क्षेत्रातील पक्षीमित्र चळवळीचे अपयश स्पष्ट होते. या संदर्भात गंभीर प्रयत्नांची गरज स्पष्ट झाली आहे.

संयोजक, १२ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन

# महाराष्ट्राच्या पक्षी विश्वाचा सर्वंकष अभ्यास (आराखडा)

महाराष्ट्रात आजवर काही शहरांच्या, प्रदेशांच्या तथा अभयारण्य आदिंच्या पक्षीसूची तयार झाल्या आहेत. सारस, माळढोक, तणमोर, इत्यादी पक्षांच्या संदर्भात काही माहीती संग्रहीत करण्याचा आंशिक प्रयत्न झाला आहे. गेल्या पाच सहा वर्षात हिवाळी पाणपक्षी गणना होऊन काही आकडेवारी गोळा होऊ लागली आहे. 'वनविभाग', 'झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया', 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' यांनी शतकभरात काही मोलाची माहीती संग्रहीत केली आहे. काही विद्यापीठांनीही अप्रत्यक्षपणे माहीती संग्रहीत केली असण्याचा संभव आहे. 'एकॉलॉजिकल सोसायटी' पुणे, या संस्थने अलीकडील काळात काही अभ्यास प्रकल्प घेतले आहेत. विदर्भात निसर्गसेवा संघाच्या 'व्ही.एन.एच.एस' सेंटरने माहीती संग्रहीत करायला सुरुवात केली आहे. काही पक्षी अभ्यासकांनीही व्यक्तीशः माहीती संग्रहाचे कार्य सुरु ठेवले आहे. पण एकतर या साऱ्या प्रयत्नांची गोळाबेरीज देखील महाराष्ट्राच्या विविधतापूर्ण, समृध्द पक्षी विश्वाविषयी पुरेशी माहीती देऊ शकत नाही. दुसरे असे की ही उपलब्ध असलेली सारी माहीती एकत्र संकलीत करुन त्याचे संहीतीकरण होणे आवश्यक आहे. तसेच पक्षी अभ्यासात रस असणाऱ्या महाराष्ट्रातील व्यक्ती आणि संस्था तथा शासन यांनी परस्पर सामंजस्याने महाराष्ट्रातील पक्षी विश्वाच्या सर्वकष अभ्यासार्थ एक योजनाबध्द कार्यक्रमही हाती घ्यायला हवा आहे. ही आजची काळाची गरज आहे. एका तपाच्या अनुभवानंतर महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाने यात पुढाकार घेणे अगत्याचे आहे. या दिशेने ठोस प्रयत्नाचा प्रारंभ १२ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनात करुया.

यासाठी **महाराष्ट्राच्या पक्षी विश्वाचा सर्वंकष अभ्यास** या विषयावर दोन चर्चासत्रातून मांडणी व्हावी असा मानस आहे. २१ फरवरीच्या चर्चासत्रात तीन गटात विभागून गटशः चर्चा व्हावी. विषयाची विभागणी पुढील प्रमाणे असावी.

१) महाराष्ट्रातील पक्षी विश्व व मानवी विश्व - सहसंबंध

२) महाराष्ट्रातील पक्षी विश्वाचे अभ्यास

३) महाराष्ट्रातील पक्षी विश्वाचे संरक्षण तथा संवर्धन.

चर्चेचा पुढील टप्पा २२ फरवरीच्या सत्रात पूर्ण व्हावा 'गट प्रभारी' व्दारा महाराष्ट्रातील सर्व सहभागींसमोर गटचर्चेचा (२१ च्या) गोषवारा सादर व्हावा, व या सामूहिक चर्चेतून तपशीलाचा अंतीम आराखडा तयार व्हावा. या आराखड्याच्या आधारे **'महाराष्ट्राच्या पक्षी विश्वाचा सर्वंकष अभ्यास'** असा विस्तृत शास्त्रीय मराठी गद्यबंध, (डॉक्युमेंट) १३ व्या संमेलनापर्यंत तयार व्हावा असा मानस आहे. या गद्यसंबंधाचा प्रारंभिक आराखडा तयार होणे ही १२ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाची प्रमुख उपलब्धी असेल.

## महाराष्ट्रातील पक्षी विश्वाचा सर्वंकष अभ्यास (आराखडा)

(इतिहास, वर्तमान तथा भविष्यातील दिशा या क्रमाने प्रत्येक मुद्याची मांडणी अपेक्षित)

**गटचर्चा १- महाराष्ट्रातील पक्षीविश्व व मानवीविश्व - सहसंबंध**

**१) महाराष्ट्रातील भौगोलिक रचना** - विभिन्न परिस्थितीक व्यवस्था - विविध पक्षीअधिवास (हॅबिटाट) तथा विविधतापूर्ण पक्षी जीवन.

**२) मानवी विकासाचा इतिहासक्रम** - परिस्थितीक व्यवस्था व पक्षीअधिवास यात मानवाने घडविलेले परिवर्तन पर्यायाने पक्षी विश्वात झालेले परिवर्तन (लाभकारक परिवर्तने, हानिकारक परिवर्तने) नैसर्गिक अधिवासातील पक्षी तथा मानव यांचे सहजीवन, मैत्री आणि पक्षीपालन - व्यावसायिक पक्षीपालन आदि. नैसर्गिक अधिवासातील पक्षी तथा मानव यांच्यातील स्पर्धा, संघर्ष तथा पक्षांची पिछेहाट.

**३) महाराष्ट्राच्या पक्षीविश्वाची वर्तमान स्थिती. निवासी पक्षी** - प्रजननातील यशापयश. वैशिष्टये आदि. स्थलांतरित पक्षी उपलब्ध माहीती. संकटग्रस्त पक्षी जाती - उपलब्ध माहीती पक्षी विश्वातील वर्तमान समस्या. सोडवणूकीची

दिशा.

गटचर्चा २- महाराष्ट्राच्या पक्षीविश्वाचा अभ्यास

१) महाराष्ट्राच्या पक्षी विश्वाविषयीचे परंपरागत मानवी ज्ञान. वाङ्‌मयातील संग्रहीत ज्ञान.

२) अर्वाचीन शास्त्रीय अभ्यासाचा विकास.

३) अभ्यासाचे वर्तमान उपक्रम - शासकीय विभाग, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था तथा व्यक्ती.

४) अभ्यासाच्या क्षेत्रातील समस्या तथा सोडवणूकीची दिशा.

५) महाराष्ट्राच्या पक्षीविश्वाचा भविष्यातील अभ्यास उपक्रमांचा आराखडा (वार्षिक तथा दीर्घकालीन)

गटचर्चा ३- महाराष्ट्राच्या पक्षीविश्वाचे संरक्षण तथा संवर्धन

१) परंपरागत संरक्षण संवर्धन संस्कार

२) वर्तमान स्थिती -

अ) शासकीय भूमिका, प्रयत्न, मुल्यांकन, शासनाकडून अपेक्षा.

आ) सामान्य जनतेची भूमिका, प्रयत्न, मुल्यांकन जनतेकडून अपेक्षा.

इ) स्वयंसेवी संस्थांची भूमिका, प्रयत्न मूल्यांकन तथा स्वयंसेवी संस्था कडून अपेक्षा.

उ) भविष्यातील संकल्पित आराखडा (वार्षिक तथा दीर्घकालीन).

**विश्वातल्या सर्व गोष्टींमागे एकच एक समान चैतन्य-त**
**आहे, याची यथार्थ जाणीव जेव्हा आपल्याला होईल, तेव्हा**
**या पृथ्वीवरच्या सर्व घटकांमध्ये आपण सुसंवाद निर्माण क**
**शकू. — गुरुदेव रान**

**D.D. KATHOLE**
MANSAR, Distt. - NAGPUR

**PARULKAR CONSTRUCTIONS**
New Ramdaspeth, NAGPUR

(वनराईच्या सौजन्या

# महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन मध्यवर्ती समिती - अहवाल

मध्यवर्ती समितीचे संगठन ही १२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाची विशेष उपलब्धी होती. खर तर अगदी लोणावळयातल्या पहिल्या मित्र मेळाव्या पासूनच संघटनेच्या चर्चेला प्रारंभ झाला होता. लोणावळयात रमेश लाडखेडकरांनी पक्षिमित्र चळवळीच्या संघटन संकल्पनेवर एक टिपण सादर केले होते. पण संमेलनाचे अनौपचारिक रुप कायम ठेवण्याकडे बहुधा बहुमताचा कौल राहत आला. तरीही रचनाबध्द संघटनेची अनौपचारिक चर्चाही दर संमेलनात उमटत राहीली. नाशिक संमेलनात तर आयोजकांनी पुढाकार घेऊन संघटनेसाठीच्या घटनेचा मसुदाही सादर केला. त्यावर प्रदीर्घ चर्चा झाली. या घटनेला पुढील म्हणजेच पुण्याच्या संमलनात अंतीम स्वरुप देण्याचा निर्णयही झाला. नंतर पुण्याच्या संमेलनाच्या विषय सूचित मात्र हा विषयच नव्हता तर संमेलनांचा असा प्रवास सुरु राहिला अखेरीस हरीहरेश्वरच्या अकराव्या संमेलनात सैलशा बांधणीच्या मध्यवर्ती संघटनेचा प्रयोग व्हावा असा निर्णय आम्ही उपस्थितांनी एक मुखाने घेतला आणि पुढे १२ व्या नागपूर संमेलनात राज्य पातळीवरील मध्यवर्ती समिती प्रथमच अस्तित्वात आली. संमेलनाने सुचविलेल्या उपक्रमांचा पाठपुरावा करायाची आणि १३ व्या संमेलनाचे स्वरुप निश्चित करण्याची जबाबदारी या समितीने स्विकारली होती. त्याला अनुसरुन ८ ऑगस्ट ९३ ला मध्यवर्ती समितीची बैठक पक्षिमित्र मंडळ नाशिक यांच्या सहयोगाने नाशिकला आयोजित झाली. मा. अध्यक्ष डॉ. श्री. रमेश बिडवे तथा संयोजक श्री रमेश लाडखेडकर यांच्या-सहीत नाशिक, विदर्भ, औरंगाबाद व कोल्हापूरचे विभागीय प्रतिनिधी या बैठकीला आवर्जून उपस्थित होते. महाराष्ट्र पातळीवरची अशी बैठक संमेलन चळवळीत प्रथमचघडून आली. मा. संयोजकांनी सादर केलेल्या १२ व्या संमेलनाच्या अहवालावर विचार विनिमय करुन समितीने एक मुखाने खालील निर्णय घेतले (१२ व्या पक्षिमित्र संमेलन अहवाला नुसार) .

**अ) संमेलन - पाठपुराव्याचे उपक्रम**

**१) १३ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन -**

**'निसर्गमित्र - गोवा'** यांच्या निमंत्रणाचा स्वीकार करुन पणजीला संमेलन आयोजन ७,८ व ९ जाने ९४ ला व्हावे असे ठरले. संमेलन व्यवस्थापनाची जबाबदारी गोव्याच्या आयोजकांनी स्वीकारावी व किमान दोन चर्चा सत्रांची जबाबदारी मध्यवर्ती समितीने स्वीकारावी अस. निर्णय झाला. स्थानिय आयोजक व मध्यवर्ती समिती यांच्या संयुक्त आयोजनाचा चळवळीच्या इतिहासातील हा पहिला प्रयोग आहे. मध्यवर्ती समिती व्दारा संयोजित दोन चर्चासत्रे अशी असतील. संमेलनातील चर्चेत 'शास्त्रीयते' वर भर असावा अशी भूमिका आम्ही स्वीकारली आहे. **'जलमयभूमि तथा हिवाळी पाणपक्षी गणना'** हे चर्चासत्रातील प्रमुख सूत्र म्हणून स्वीकारले आहे. एक स्वतंत्र चर्चासत्र या विषयाला वाहिलेले असेल. या चर्चेतून भविष्यातील 'गणना' महाराष्ट्रात अधिक संघटीत पध्दतीने होईल अशी समितीची अपेक्षा आहे. अशा महाराष्ट्र-भरातील संघटीत उपक्रमातून संमेलन चळवळीलाही बळ मिळेल अशी आमची धारणा आहे. दुसरे सत्र पक्षिमित्र चळवळीच्या संघटन विषयक चर्चेला वाहिलेले असेल.

**२) विभागीय संमेलन**

विभागीय संमेलनाच्या उपक्रमात विदर्भाने आघाडी घेतली आहे. २७/२८ नोव्हें ला भंडाऱ्यात विदर्भ संमेलनाचे यशस्वी अयोजन झालेले आहे. अन्य विभागीय प्रतिनिधींनी विभागीय संमेलनांच्या खालील प्रमाणे संभाव्य तारखा जाहीर केल्या.

नाशिक - २५/२६ डिसें ९३, कोल्हापूर- २ रा आठवडा डिसे ९३, औरंगाबाद - फरवरी ९४

**३) पक्षिमित्र तथा संस्थासूचि**

महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या व्यासपीठाशी अधिकाधिक पक्षि-मित्रांना जोडून घेण्यासाठी आपापल्या विभागातील पक्षिमित्र, पक्षिअभ्यासात सक्रीय संस्था, तथा पक्षीतज्ञ यांची तपशीलवार सूची संयोजक कार्यालयाला (नागपूर)

पाठविण्याचे आश्वासन विभागीय प्रतिनिधींकडून मिळाले.

**४) महाराष्ट्रातील पक्षिविश्वाचा सर्वंकष अभ्यास**

हा प्रकल्प महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या मध्यवर्ती समितीने स्वीकारावा अशी अपेक्षा १२ व्या संमेलनाच आयोजकांनी बाळगली होती. या महत्वाकांक्षी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याइतपत संसाधने अद्याप मध्यवर्ती समि जवळ उपलब्ध नसल्यामुळे या वर्षी पुरती या उपक्रमाची अंमलबजावणी स्थगित करण्याचे ठरले. पक्षि विषयक अभ्यासा प्रकल्प संस्था किंवा व्यक्तींनी घ्यावे असा प्रयत्न करावा व अशा प्रकल्पांना प्रोत्साहनार्थ शक्य ते सहाय्य केन्द्रीय समित घ्यावे अशी भूमिका सर्वमान्य झाली.

**५) महाराष्ट्र पक्षिसूची संकलन**

या उपक्रमाला प्राधान्य देण्याचे मध्यवर्ती समितीने एकमुखाने स्वीकारले. विभागीय प्रतिनिधीनी आपपल विभागांची अधिकृत पक्षिसूची प्रत केन्द्रीय कार्यालयाला (नागपूर) पुढील संमेलनापूर्वी पाठवावी. १३ व्या पक्षिमि संमेलनात संपूर्ण महाराष्ट्राच्या सूचि संकलनाच्या उपक्रमाचा आढावा घेण्यात येईल.

**६) हिवाळी पाणपक्षी गणनेतील सहयोग**

महाराष्ट्रातील हिवाळी पाणपक्षी गणनेच्या उपक्रमाच्या समन्वयाच्या कार्यात मध्यवर्ती समितीने महत्वाची भूमि स्वीकारावी या संदर्भात १३ व्या संमेलनातील चर्चासत्रात गणनेच्या समन्वयाच्या योजनेला अंतीम रुप देण्यात येईल.

**७) डॉ. सलीम अली जन्मशताब्दी वर्ष-उपसमिती**

**नियुक्त उपसमिती -**

डॉ. श्री. रमेश बिडवे - **(अध्यक्ष)** डॉ. श्री. सत्यशील नाईक तथा श्री. व्ही.सी. आंबेडकर **(सदस्य)**

उपसमिती १३ व्या संमेलनात अहवाल सादर करेल.

**अ) महाराष्ट्र शासनासाठी ठराव-शिफारसी**

**१) प्रस्तावित राज्यपक्षी - खंड्या**

'हरियाल' हा राज्य पक्षी शासनाव्दारे घोषित झाला आहे या पार्श्वभूमिवर खंड्याला राज्यपक्षी घोषित करण्यासंब मागणी सोडून देण्यात यावी. मात्र महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या आजवरच्या परंपरेस अनुसरुन भविष्यातही 'खंड्या' पक्षिमित्र संमेलनाचे प्रतिक चिन्ह राहील.

**२) पक्षी अधिवासांचे संरक्षण**

महाराष्ट्रातील पक्षी अधिवासांचे संरक्षण ठरावाचा पाठपुरावा करु नये. त्या ऐवजी सिंचन विभागाच्या नि तलावांवर पक्षिअधिवास विकसीत करण्याच्या संदर्भात निवृत इंजिनियर श्री. स.कृ. जोशी (नाशिक) प्रकल्पाचा तां आराखडा तयार करुन समितीला सादर करतील. त्यावर आधारित प्रस्ताव समिती महाराष्ट्र शासनाला सादर करेल. अ प्रस्तावांच्या पाठपुराव्याचा कार्यक्रम १३ व्या संमेलनात निश्‍चित केला जाईल.

**३) नागपूर -'सोनेगांव तलाव बचाओ' आंदोलन**

'सोनेगाव तलाव बचाओ' समितीचा ठराव तथा निवेदन प्राप्त करुन घेऊन या एवजी समितीने ठरावाला सम देणारा ठराव १३ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात व्हावा व त्याचा पाठपुरावां मध्यवर्ती समितीने करावा.

**संयोजक , मध्यवर्ती समिती**

# विदर्भातील पक्षिमित्र चळवळ

## मागोवा

१९७८ साली नागपूरात 'नेचर लव्हर्स' नावाने मोजक्या पक्षिनिरीक्षकांचा एक गट तयार झाला. हळुहळू शास्त्रीय अभ्यासाच्या दिशेने वाटचाल सुरु झाली. ८० च्या सुमारास नागपूर परिसरातील पक्षिसूचि तयार करण्यासाठीच्या प्रयत्नांचा प्रारंभ झाला. ८१ साली महाराष्ट्र पातळीवरील पक्षिमित्रांचा एक अनौपचारिक मेळावा श्री. प्रकाश गोळेंच्या पुढाकाराने लोणावळ्यात आयोजित झाला. या मेळाव्याने महाराष्ट्र-भरातील पक्षिमित्रांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. विदर्भही त्यात मागे राहिला नाही. किंबहुना पुढाकार घेऊन नागपूरच्या मोजक्या पक्षिमित्रांनी ८२ सालच्या २ ऱ्या पक्षिमित्र संमेलनाची जबाबदारी स्वीकारली व ती यशस्वी रित्या पार ही पाडली. मात्र विदर्भात पक्षी अभ्यासकांची संख्या हवी त्या गतीने वाढली नाही. प्रत्यक्ष पक्षिमित्र संमेलनातील सहभागी पक्षिमित्रांची संख्या तर अगदी बोटांवर मोजण्याच्या मर्यादितच राहीली.

१९८६ साली रमेश लाडखेडकरांच्या पुढाकाराने निसर्ग सेवा संघाची नागपूरात स्थापना झाली. निसर्गाच्या शास्त्रीय अभ्यासार्थ निसर्ग सेवा संघाने व्हि एन एच एस (विदर्भ नॅचरल हिस्ट्री स्टडी सेन्टर) ची रचना केली. आणि इथुनच विदर्भातील पक्षिजीवनाच्या शास्त्रीय अभ्यासाला खऱ्या अर्थाने सुरवात झाली. नागपूर परिसराची पक्षिसूची प्रकाशित झाली. १९८७ पासून ऐक वर्कींग ग्रूप ऑफ इंडिया आणि क्रौंच (Crancs) पक्षांचे वार्षिक सर्वेक्षण (विदर्भ) होऊ लागले. तलावांवर वार्षिक हिवाळी पाणपक्षी गणना नेमाने सुरु झाली. BNHS चे पाणपक्षी गणना प्रकाराचे समन्वयक श्री. एस.ए. हुसेन यांच्या विनंतीवरुन श्री. रमेश लाडखेडकरांनी पाणपक्षी गणनेच्या कामात विदर्भात 'समन्वया' ची जबाबदारी स्वीकारली. या प्रयत्नातून विदर्भात पाणपक्षी गणनेत सहभागी होणाऱ्या पक्षी निरीक्षकांच्या संख्येत व तलावांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. अनुभवी पक्षिमित्रांच्या सहवासमुळे नव्या पक्षिनिरीक्षकांचे अनौपचारिक प्रशिक्षण 'गणने' मुळे घडुन आले. परिणामी विदर्भात पक्षिनिरीक्षकांच्या संख्येत वाढ तर झालीच पण बुलढाण्यापासून भंडाऱ्या पर्यंतच्या पक्षिमित्र तथा संस्था यांच्या दरम्यान एक अनौपचारिक संपर्क व्यवस्था आकारण्यात आली. पक्षीमित्रांना संघटीत करण्यासाठी 'पाणपक्षी गणना' हे एक अत्यंत प्रभावी साधन ठरु शकते हा विदर्भाचा अनुभव आहे. त्यामुळेच साऱ्या महाराष्ट्रात पक्षीमित्र चळवळ संघटीत करण्यासाठी 'गणने' चे हे माध्यम उपयुक्त ठरु शकेल असेही वाटते.

नागपूर शहर पक्षिमित्र संमेलन या पार्श्वभूमिवर १२ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन विदर्भात आयोजित झाले. पाणपक्षी गणनेतून आकाराला आलेली विदर्भातील पक्षिमित्रांच्या दरम्यानची अनौपचारीक संपर्क व्यवस्था बळकट करण्यासाठी या संमेलनाचा चांगला उपयोग होऊ शकेल याचे संमेलनाच्या संयोजन समितीला भान होते. म्हणून या उद्दिष्ट पूर्ती साठी संमेलनाचा आम्ही योग्य लाभ घेऊ शकलो.

१२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या अनुषंगाने पक्षिदिनाच्या निमित्ताने १२ ते १५ नोव्हे ९२ दरम्यान आम्ही नागपूर शहराचे प्रथम पक्षिमित्र संमेलन आयोजित केले. शहर पातळीवरील साऱ्या महाराष्ट्रातील हे बहुधा पहिलेच संमेलन असावे. सुमारे पन्नास पक्षिमित्र या संमेलनात सहभागी झाले आणि शहरातील विविध पक्षि-अधिवासांसंबंधी उपयुक्त चर्चा झाली. पश्चिम नागपूरचे आमदार श्री. विनोद गुडधे पाटील संमेलनाला आवर्जून उपस्थित होते. ७ नोव्हें ९३ ला नागपूरचे दुसरे संमेलन कोराडीच्या औष्णिक विद्युत केन्द्राच्या परिसरात घेतले. याही संमेलनात सुमारे पन्नास पक्षिमित्र सहभागी झाले आणि विद्युत केन्द्राचे प्रमुख तंत्रज्ञ श्री. कुकडे पूर्ण वेळ चर्चासत्रात उपस्थित राहिले. विद्युत केन्द्र परिसरातील पक्षी जीवनाच्या संरक्षण तथा अभ्यासाच्या पक्षिमित्रांच्या प्रयत्नात सहयोग देण्याचे त्यांनी मान्य केले. संमेलनाचे हे यश महत्वाचे वाटते. शहर पातळी वरील पक्षिमित्र संमेलनाचा असा प्रयोग महाराष्ट्रभर आपल्याला राबवता येणार नाही का ?

## प्रथम विदर्भ पक्षिमित्र संमेलन

१२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाला जोडून २१फरवरी ९३ ला नागपूरच्या आमदार निवासात आम्ही विदर्भाचे एक दिवसीय विभागीय संमेलन आयोजित केले. ११ व्या हरीहरेश्वरच्या संमेलनात विभागीय संमेलनांना प्रोत्साहन देण्याचे

धोरण सर्वमान्य झाले होते. या जोड संमेलनामुळे १२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनातील विदर्भातील सहभागींच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. परिणामी या वर्षी विदर्भातील पक्षिमित्र चळवळीला चांगली चालना मिळालीय असा आमचा अनुभव आहे.

प्रथम विदर्भ पक्षिमित्र संमेलनाचे संमेलनाध्यक्षपद श्री. रमेश लाडखेडकर यांनी भूषविले. उद्घाटक श्री. मारुती चितमपल्ली तर प्रमुख अतिथी श्री. चिंतामणराव किरपेकर निवृत्त वनअधिकारी (संस्थापक प्राचार्य इंडीयन वाइल्डलाईफ इन्स्टिटयूशन डेहराडुन) हे होते. चर्चा सत्राचे सूत्र सामान्यपणे हौशी पक्षिनिरीक्षणातून शास्त्रीय पक्षि-अभ्यासाच्या दिशेने प्रगती साधणे हा होता. नागझिऱ्याचे अभ्यासू वनअधिकारी श्री. बाळ कळस्कर यांनी पारदर्शिकांच्या सहाय्याने **'Cavity Using Birds Of Nagsira'** असा विषय मांडला व त्यावर उपयुक्त चर्चा झाली.

पक्षी अधिवास संरक्षाणाच्या अनुषंगाने श्री. गोपाळ ठोसर यांनी नागपूर शहरातील 'सोनेगांव तलाव वाचविण्यासाठी चाललेली लोक चळवळ' या विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी केली. या अनुषंगाने शहरांमधील पाणवढयांच्या प्रश्नावर उपयुक्त चर्चा झाली. पहिल्यांदाच संमेलनात सहभागी झालेल्या विदर्भातील पक्षिमित्रांना या चर्चा सत्रांमधून बरच काही शिकायला मिळाला यात शंका नाही.

प्रथम विदर्भ संमेलनाच्या पाठपुराव्याचे उपक्रम म्हणून प्रत्येक केन्द्राने स्वतंत्र पक्षी सूची तयार करणे, केन्द्रशः पक्षिमित्र तथा संस्थांची सूची तयार करणे, पक्षिनिरीक्षकांसाठी प्राथमिक प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करणे तथा प्रत्येक केन्द्रात स्थानिक संमेनाचे आयोजन करणे असे उपक्रम स्विकारले गेले. संमेलनांच्या दरम्यान सूसूत्रता राखण्यासाठी तथा पाठपुराव्याच्या उपक्रमांच्या यशस्वी अंमल बजावणी साठी विदर्भ विभागाची जबाबदारी सांभाळणरी मध्यवर्ती यंत्रणा या नात्याने **'विदर्भ पक्षिमित्र मंच'** एक मताने स्थापन करण्यात आला. मंचाची स्थापना ही प्रथम विदर्भ पक्षिमित्र संमेलनाची सर्वात महत्वाची उपलब्धी मानावी लागेल. कारण निश्चित स्वरुपाची रचना असलेली ही महाराष्ट्र पक्षिमित्र चळवळीतील पहिली विभागीय संघटना आहे.

**२ रे विदर्भ संमेलन**

२७ व २८ नोव्हे ९३ ला विदर्भाचे दुसरे पक्षिमित्र संमेलन भंडारा शहरात आयोजित झाले. **'भंडारा निसर्ग तथा सांस्कृतीक अभ्यासमंडळ'** या संस्थेने हे यशस्वी आयोजन केले होते. संमेलनाध्यक्षपद श्री. गोपाळ ठोसर यांनी भूषविले.

पक्षि निरीक्षणाचे तंत्र या विषयाची मांडणी श्री. प्रकाश गर्दे यांनी पारदर्शिकांच्या सहाय्याने केली. विदर्भातील पक्षिनिरीक्षकांसाठी ही चर्चा विशेष उपयुक्त ठरली. दुसऱ्या दिवशी भंडाऱ्याचे अनुभवी पक्षिनिरीक्षक श्री. राजकमल जोब यांनी 'भंडारा परिसरातील पाणवठे व त्यांचे प्रश्न' या विषयावर टिपण मांडले. त्यांनंतर पाठपुराव्याच्या उपक्रमांवर चर्चा झाली. विविध केन्द्राकडून आलेल्या पक्षिसूचि चे संकलन करुन सुमारे तीनशे पंचेवीस पक्ष्यांचा विदर्भाच्या पक्षिसूचिचा तयार झालेला आराखडा सादर करण्यात आला व पुढील पक्षिदिना पर्यंत विदर्भ पक्षिसूचीला अंतीम रुप देण्याचा संकल्प करण्यात आला. ९४ सालाच्या हिवाळी पाणपक्षी गणनेचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. **BNHS** चा **'Dr Salim Ali Bird Count'** चा उपक्रम स्वीकारण्यात आला व त्याच्या अंमलबाजवणीचा संकल्प करण्यात आला. अमरावतीच्या तिसऱ्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनात (नोव्हे ९४) पुन्हा भेटण्याचे आश्वासन देऊन भंडारा संमेलनाची सांगता झाली.

व्दितीय विदर्भ पक्षिमित्र संमेलन काही दृष्टींनी वैशिष्टपूर्ण ठरले. एकतर विभागीय संघटना (विदर्भ पक्षिमित्र मंच) तथा स्थानिक आयोजक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने घडणारे हे केवळ विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील पहिलेच संमेलन होते. अशा संयुक्त उपक्रमाचे लाभही या संमेलनामुळे स्पष्ट झाले. छोटया शहरात संमेलन आयोजनाचा हा पाहिला वहिला प्रयोग ठरावा. भविष्यातील महाराष्ट्र भरातील अशा प्रकारच्या प्रयोगांना दिशादर्शन करणारा हा अनुभव ठरावा. विदर्भ पक्षिमित्र मंचाला अधिकृत स्वरुप प्राप्त करुन देणे ही या संमेलनाची सर्वात मोठी उपलब्धी मानावी लागेल.

## विदर्भ पक्षिमित्र मंच - घटना

**१) नाव - विदर्भ पक्षिमित्र मंच**

**२) पत्ता - व्दारा रमेश लाडखेडकर,**

नागपूर टाईम्समागे, रामदासपेठ, नागपूर - ४४० ०१०

**३) कार्यक्षेत्र - विदर्भ**

**४) भूमिका**

महाराष्ट्रातील पक्षिमित्र चळवळ संघटीत करण्यासाठी १२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात राज्य पातळीवरील मध्यवर्ती समितीचे गठन करण्यात आले. महाराष्ट्र पक्षिमित्र चळवळीच्या संगठनाचा आधारभूत घटक विभागीय संघटना हा असावा हे सूत्र स्वीकारण्यात आले. यानुसार महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेत विदर्भाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी 'विदर्भ पक्षिमित्र मंच' गठीत झाला आहे.

पक्षिमित्र चळवळीशी बांधिलकी असणा-या विदर्भातील विविध संस्था तथा व्यक्ती यांच्या दरम्यान संपर्क तथा समन्वय साधणा-या व्यासपीठाची भूमिका मंचाने स्वीकारली आहे. या अथनि विदर्भ पक्षिमित्र मंच ही विभागीय परिषद आहे.

**५) उद्दिष्ट**

महाराष्ट्रात पक्षी तथा पक्षिअधिवास यांचे संरक्षण, संवर्धन तथा अभ्यास यांना चालना देण्याचे ध्येय धोरण महाराष्ट्र पक्षिमित्र चळवळीने अंगिकारले आहे. हेच उद्दिष्ट विदर्भ पक्षिमित्र मंचाने स्वीकारले आहे. उद्दिष्ट पूर्तीसाठी मंचाच्या संकल्पित उपक्रमांचे स्वरुप पुढील प्रमाणे असेल.

अ) विदर्भातील पक्षिमित्र चळवळीच्या संगठनार्थ पक्षिमित्रांचे स्नेहमीलन घडविण्यासाठी बार्षिक पक्षिमित्र संमेलनाचे संयोजन करणे.

आ) लोक शिक्षणार्थ विदर्भातील पक्षिअधिवास तथा पक्षिजीवना विषयीच्या माहीतीचे संकलन, संग्रहण, संस्करण, प्रकाशन तथा प्रसारण करणे.

इ) पक्षी तथा पक्षी अधिवास यांच्या संरक्षण तथा संवर्धनाविषयीच्या समस्यांकडे पक्षिमित्र, स्वयंसेवी संस्था, शासन तथा समाजाचे लक्ष वेधणे.

ई) पक्षांसाठी 'संरक्षित क्षेत्र' निर्माण करण्यासाठी प्रयत्नरत असणे.

**६) सदस्यता**

विदर्भ पक्षिमित्र मंच निम्नलिखीत (व्यक्ती तथा संस्था ) सदस्यांचे मिळून बनलेले संघटन असेल.

अ) **संस्थापक सदस्य** - ३१ डिसे. ९३ पर्यंत २०००/- रुपये शुल्क जमा करणारी संस्था तथा १,०००/- रुपये जमा करणारी व्यक्ती संस्थापक सदस्य मानली जाईल.

आ) **अजीवन सदस्य** - १,०००/- रुपये शुल्क जमा करणारी संस्था तथा ५०० रुपये जमा करणारी व्यक्ती आजीवन सदस्य मानली जाईल.

इ) **संलग्न सदस्य** - २००/- रुपये वार्षिक शुल्क जमा करणारी संस्था तथा १००/- रुपये वार्षिक शुल्क जमा करणारी व्यक्ती संलग्न सदस्य मानली जाईल. दरवर्षी ठराविक मुदतीत शुल्क राशी जमा करुन संलग्न सदस्यत्वाचे नवीनी-करण आवश्यक मानले जाईल. संस्थापक सदस्य, अजीवन सदस्य तथा संलग्न सदस्य अशा सर्व प्रकारच्या सदस्यांचा मिळून मंच तयार होईल. मंचाची वर्षातून किमान एक बैठक होईल. बैठकीत उपक्रम अर्थव्यवस्था तथा संघटन या संदर्भातील

धोरणात्मक निर्णय होतील. व दर तीन वर्षासाठी संचालक मंडळाची निवडणूक होईल.

### ७) संचालक मंडळ

अ) संचालक मंडळाची निवड मंचाच्या वार्षिक बैठकीत होईल व संचालक मंडळाचा कार्यकाल तीन वर्षाचा असेल.

आ) संचालक मंडळ एक अध्यक्ष तथा सहा संचालक अशा सात निर्वाचित सदस्यांचे बनलेले असेल. संस्थापव सदस्यांमधून दोन आजीवन सदस्यातून दोन तथा संलग्न सदस्यातून तीन संचालक सदस्य निर्वाचित होणे अभिप्रेत आहे.

इ) संघटन,अर्थव्यवस्था तथा उपक्रम या संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी वर्षातून किमान दोनदा संचालव मंडळाच्या बैठकी होतील. मा. अध्यक्ष हे प्रमुख पदाधिकारी असतील ते निर्णयांच्या अंमलबजावणी साठी एका संचालकाच 'विदर्भ संघटक' म्हणून नेमणूक करतील संघटक मा. अध्यक्षांच्या मार्गदर्शनात मंचाच्या प्रबंधनाची जबाबदारी सांभाळेल.

### ८) प्रबंधन यंत्रणा

सामान्यपणे प्रत्येक जिल्हयात सदस्य संस्था तथा व्यक्तींचे मिळून किमान एक केन्द्र प्रस्थापित केल्या जाईल केन्द्रातील संलग्न सदस्य व विदर्भ संघटक यांच्या सहाय्याने मा. अध्यक्ष प्रत्येक 'केन्द्र संघटकांची' नेमणूक करतील. केन संघटक केन्द्र प्रबंधनाच्या कामासाठी जबाबदार असेल. मा. अध्यक्ष, विदर्भ संघटक तथा केन्द्र प्रमुख मिळून विद पक्षिमित्र मंचाचा 'कार्यगट' तयार होईल. हा कार्यगट संचालक मंडळाच्या निर्णयांची अंमल बजावणी करेल. सर्व केन संघटकांच्या कार्यात समन्वय राखण्याची जबाबदारी विदर्भ संघटक पार पाडेल. सर्व निर्णयाचे अंतीम अधिकार म अध्यक्षांकडे असतील.

---

### विदर्भ पक्षिमित्र मंच

प्रथम विदर्भ पक्षिमित्र संमेलनात प्रायोगिक तत्वावर स्थापन झालेल्या विदर्भ पक्षिमित्र मंचाने एक वर्षात 'घटने' त अंतीम स्वरुप देऊन व्दितीय संमेलनात सर्वमान्यता प्राप्त करुन घेतली आहे. एका अर्थाने महाराष्ट्र पक्षिमित्र चळवळी संघटन क्षेत्रात विदर्भाने अग्रक्रम घेतला आहे. विदर्भाचा हा अनुभव अन्य विभागांनाही लाभ कारक ठरु शकतो म्हणून समजून घ्यायला हवा असे वाटते.

**अजय डोळके : विदर्भ संघटक**
**विदर्भ पक्षिमित्र मंच**






# स्पंदने

८१ साली लोणावळयात सुरु झालेल्या पक्षिमित्र संमेलनांचे प्रथम आवर्तन पुण्यातील ८७ सालच्या संमेलनात पूर्ण झाले होते. दुसऱ्या आवर्तनाची सुरवात पुन्हा विदर्भापासून होणे अभिप्रेत होते. अशावेळी संमेलनाचे भविष्यातील स्वरुप कसे असावे याचा वेध घेण्यासाठी श्री. रमेश लाडखेडकरांनी तोवरच्या संमेलन आयोजकांशी पत्रस्वरुपाने चर्चा केली. महाराष्ट्रातील पक्षिमित्र संमेलन चळवळीतील प्रारंभिक पर्वातील या पत्र चर्चेतून उमटलेली स्पंदने ईथे आवर्जून सादर करीत आहोत. पक्षिमित्र चळवळ आणि ती पुढे नेण्यासाठी धडपडणारी माणसं यांच्या मानसाची ही 'अंतरंग स्पंदने' बरच काही सांगुन जातात. — संपादक

प्रति,

पक्षिमित्र

पक्षी मित्र संमेलना विषयीचा विचार आपल्या मनात असेलच. या विषयावर सामूहिक चिंतन व्हावे या हेतूने हे पत्र लिहीत आहे. गेल्या काही वर्षापासून अनौपचारिक रित्या महाराष्ट्र पक्षी मित्र संमेलनाच्या मूल्यांकनाची प्रक्रिया दर संमेलनातील भेटी गाठीत सुरु झालेली आहे. ती स्वाभाविकही आहे. सर्वश्री प्रकाश गोळे यांनी काही नेमक्या पक्षी मित्रांच्या लोणावळयातल्या शिबीरापासून या चळवळीची सुरुवात केली होती. गेल्या सात संमेलनातून मुळातले हेतु आणि अपेक्षा कितपत पूर्ण झाल्या ? भविष्यातली दिशा कोणती असावी ? हे अन् असे अनेक प्रश्न ही चळवळ वाढावी यासाठी धडपणाऱ्या आपल्यासारख्या लोकांच्या मनातही घोळत असणार. अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याची निकड आज उत्पन्न झाली आहे असे तीव्रतेने वाटू लागले आहे.

सात वर्षात संमेलनाचे एक आर्वतन आपण पूर्ण केले आहे. अशावेळी थोड थांबून सिंहावलोकन कराव व नंतरच अधिक वरच्या टप्प्यातला प्रवास सुरु करावा हे अधिक योग्य होईल असे वाटते. या वर्षी नेहमी प्रमाणे संमेलन घेण्या ऐवजी आजवरच्या संमेलनाच्या आयोजकांनी एकत्र येऊन एक दोन दिवसांच्या शिबीरात चळवळीवर सखोल विचार करावा अशी माझी आग्रहाची सूचना आहे. सामान्यपणे नोव्हें/डिसें. मध्ये असे शिबीर नागपुरला आयोजित करण्याची जबाबदारी निसर्ग सेवा संघ घेऊ इच्छिते या शिबीरा संबंधी आपल्या प्रक्रिया व सूचना जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

लोणावळा, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद, सोलापूर नाशिक व पुणे संमेलनांच्या आमंत्रकांना हे पत्र लिहीले आहे.

आपल्याकडून त्वरीत प्रत्युतराची अपेक्षा

नागपूर

दिनांक १०-७-८७

आपला स्नेहांकित,

**रमेश लाडखेडकर**

प्रिय श्री. लाडखेडकर यांसी,

सप्रेम नमस्कार

आपले पत्र मिळाले. गेले दोन तीन दिवस आपल्या पत्राचा मी सतत विचार करीत होतो. तसेच ७ व्या महाराष्ट्र पक्षी मित्र संमेलनाच्या प्रक्रिया माझ्यासमोर होत्याच. लोणावळा व पुणे येथील ७ वे पक्षी मित्र संमेलन, या सर्व संमेलनाला उपस्थित राहण्याचा मला योग आला आहे. ही एक जमेची बाजू झाली.

लोणावळयाच्या संमेलनांत, पुढील संमेलनेही सोहळयाच्या स्वरुपाची होतील असे काही ठरले नव्हते. तरीही ते सोहळयाचे स्वरुप बनत गेले व त्या विषयी उलट-सुलट प्रतिक्रियाही यावयास लागल्या. या संमेलनातून काही शाखा आर्थिक दृष्टया मजबूत झाल्या ही एक फायद्याची गोष्ट झाली. तसेच या संमेलनांतून आपण जे काही ठरविले त्यापैकी भिगवण येथील अभयारण्य करण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न चालू आहेतच. जायकवाडी येथे असेच अभ्यारण्य व्हावे म्हणून औरंगाबदचेही प्रयत्न चालू आहेत. स्थानिक प्रसिध्दी व पक्षी मित्र संमेलन यामुळे त्या त्या विभागांत पक्षी जागृती होत आहे. अर्थात चांगल्यापैकी पक्षीनिरिक्षक तयार होणे व त्याच्याकडून एखादा प्रकल्प तयार होऊन पार पडणे हे काही घडले नाही. संमेलनानंतर पक्षी निरिक्षकांच्या दृष्टीने काही कार्यशाळा होण्याची व त्यांत श्री. प्रकाश गोळे, श्री. विजय आंबेडकर, श्री. मारुती चितमपल्ली इ. पक्षीज्ञांकडून पक्षी विषय मार्गदर्शनाची अपेक्षा होती व त्यांचेकडे असलेले सखोल ज्ञान अशा कार्यशाळांव्दारे इतरांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक होते. वेळोवेळीच्या संमेलनांतून ज्या चर्चा झाल्या त्याचा फारसा पाठपुरावाही केला गेला नाही.

सात संमेलने होऊन ही महाराष्ट्रातील नैसर्गिक दृष्टया समृध्द असलेल्या कोकणात कुठल्याही प्रकाराची पक्षी विषयक संस्था आवश्यक असून सुध्दा अद्याप स्थापन झालेली नाही. हया भागात निसर्गसंवर्धन व संरक्षणाचे कार्य फारच मोलाचे आहे. कोल्हापूरकडील काही मंडळींनी हयाची जबाबदारी घेतल्याचे मला स्पष्ट आठवते.

संमेलनाला सर्वच बाजूनीं प्राथमिक स्वरुप येण्यासाठी हया भागातील मंडळींचा प्रयत्न आवश्यक आहे असे मला वाटते. आपण नागपूर येथे संमेलन घेण्यापुर्वी नाशिक अथवा औरंगाबाद येथे दिवाळीपूर्वी संमेलना- निमित्त भेटावे. या एक किंवा दोन चर्चेत आपल्याला एकंदर पुढील कार्याची दिशा ठरविता येईल. संमेलनाचे स्थळ किंवा कार्यशाळा कोकणात असावे असे आवर्जून वाटते.

हया प्रति. लोणावळा/नागपूर/कोल्हापूर/औरंगाबाद/सोलापूर/नासिक व पुणे येथील संमेलनाच्या आमंत्रकांना पाठविलेले आहेत.

पुणे, दि. २० जुलै १९८७
१२०/४, मॉडेल कॉलनी
पुणे ४११ ०१६

आपला स्नेहांकित,
डॉ. रमेश बिडवे,
अध्यक्ष - विहंग मित्र,

मित्रवर्य श्री. रमेश लाडखेडकर यांना स.न.

आपले पक्षी-मित्र संमेलनाच्या स्वरुपाचा फेर विचार करण्या बद्दलचे पत्र पोचले. उत्तराच्या दिरंगाईबद्दल क्षमस्व. आमचे स्वतःचेच विचार सुस्पष्ट होण्यास वेळ लागला.

आमच्या मते पक्षी-मित्र- संमेलनाची प्रमुख कार्ये पुढील प्रमाणे आहेत व असावीत -:

१) विविध भागातील पक्षी-निरीक्षकांची, व त्याच बरोबर निसर्ग-प्रेमी व निसर्ग-संरक्षणात रस घेणाऱ्या व्यक्तींची एकमेकांशी गाठे पडावी, त्यांनी चालवलेल्या कार्याची एकमेकांना माहिती व्हावी व विचार विनिमय व्हावा. बऱ्याच वेळा एकाच गांवातील व्यक्तीना एकमेकांची माहिती नसते. ती अशा संमेलनाच्या वेळी होते.

२) पक्षी - निरीक्षणाच्या छंदाचा समाजात जास्त प्रसार व्हावा, व जागोजागच्या संस्थाना जास्त स्थानिक प्रसिध्दी मिळून त्यांना अधिक सभासद मिळावेत, त्यांचा जन-संपर्क वाढावा.

३) पक्षी - निरीक्षणाच्या क्षेत्रात जास्त सखोल व गंभीर स्वरुपाचा अभ्यास व संशोधन करण्यास सभासदांना उत्तेजन द्यावे, व त्यांना आपल्या संशोधनाचा वृत्तांत सादर करण्यास एक व्यासपीठ मिळवून द्यावे.

४) सर्व - साधारण जनतेमध्ये पक्षी, निसर्ग व परिसर यांच्या संरक्षण व विकासा बद्दल जागृती निर्माण करणे.

५) शासकीय पातळीवर प्रयत्न करुन पक्षी निसर्ग व परिसर यांच्या रक्षणासाठी नवीन अभयारण्ये वा संरक्षित क्षेत्रे निर्माण करणे, असलेले कायद्र व नियम यांची कडक अंमलबजावणी करणे व जरुर तर नवीन कायदे करणे. आज पर्यंतच्या पक्षी-मित्र संमेलनांचा विचार करता वरील पैकी १,२ व ४ हे हेतू त्यांमधून चांगल्या रीतीने पार पडले आहेत. शासकीय पातळीवरील ५ नंबरच्या उद्देशाला देखील मर्यादित प्रमाणात यश मिळाले आहे. पण त्या बाबतीत जागोजागच्या पक्षी-निरीक्षक संस्थांचे स्वतःचे वर्षभर चालेलेले प्रयत्न अधिक महत्वाचे आहेत. उदा. मुळा-मुठा, मायणी भिगवण ही झालेली किंवा होऊ घातलेली अभयारण्ये.

३ नंबरच्या हेतू पैकी संशोधनाचा किंवा अभ्यासाचा वृत्तांत सादर करण्यास व्यासपीठ मिळवून देण्याचे काम ही संमेलने करतच आहेत. पण पक्षी-निरीक्षणाच्या क्षेत्रात जास्त सखोल व गंभीर स्वरुपाचा अभ्यास व संशोधन करण्यास आपल्या सभासदांना उत्तेजन देण्यात मात्र या सर्व संमेलनांना अपयश आहे आहे, हे मात्र या सर्व कबूल करायला पाहिजे.

पण आम्हाला असे वाटते की या प्रकारच्या कार्याची संमेजनांकडून अपेक्षा करणे, व ती अपेक्षा पूर्ण न झाल्याबद्दल खंत बाळगणे. हे फारसे बरोबर नाही. अभ्यास व संशोधन या सभासदांनी स्वयं-प्रेरणे ने करावयाच्या गोष्टी आहेत. त्या बद्दल कोणी जबरदस्तीही करु शकत नाही व उत्तेजन देऊन फारसा उपयोग होत नाही.

क्रमशः

वरील ५ हेतूंशिवाय, प्रत्यक्ष पक्षी-निरीक्षणाला या संमेलनांमध्ये स्थान मिळावे अशी बऱ्याच सभासदांचीं मागणी आहे. आजपर्यंत ही संमेलने प्रत्यक्ष पक्षी निरीक्षणासाठी नाहीत असे तत्व मानले गेले, पण प्रत्येक संमेलनाला जोडून पक्षी-निरीक्षणाची सहल असे सभासद त्यांत अत्यंत उत्साहाने भाग घेतात. आपल्या पेक्षा तज्ञ व अनुभवी अशा पक्षी-निरीक्षकाच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला नवीन पक्षी बघायला मिळतील व ते ओळखण्याची खास लक्षणे आपल्याला शिकायला मिळतील अशी बहुतेक सर्व सभासदांची इच्छा असते. अशी मोठी अपेक्षा मनांत ठेवूनच बरेच सभासद संमेलनाला येतात. म्हणून पक्षी-मित्र संमेलनामध्ये प्रत्यक्ष पक्षी निरीक्षणाला मानाचे स्थान देण्याचा जरुर विचार करण्यांत यावा.

सारांश सध्याचा सोहोळयाच्या स्वरुपात देखील ही संमेलने आपले बहुतेक सर्व हेतू चांगल्या रीतीने साध्य करीत आहेत. व ती थोडया-फार सुधारीत स्वरुपात पुढे चालू रहावीत, - नवीन नवीन ठिकाणी ती भरविण्यात यावी.

अधिक गंभीर स्वरुपाच्या अभ्यासकांसाठी या संमेलनांमध्ये वा त्याला जोडूनच एक किंवा दोन सेशन्स (जरुरी प्रमाणे) घेण्यात यावी, व त्यासाठी पुरेसा वेळ मिळेल याची खबरदारी संयोजकांनी घ्यावी.

आपला

दि. : ८ - ८ - १९८७

सुभाष आठल्ये
(निसर्ग-मित्र साठी)

**ताक** : मुख्य म्हणजे संमेलनांत कोणाही पक्षी मित्राला - नवा/जुना, नवखा/तज्ञ, हौशी,/संशोधन असा भेदभाव न करता सहभागी होता यावे. ते फक्त तज्ञ, अभ्यासू व संशोधक पक्षी-निरीक्षकांचे संमेलन होऊ नये.

---

प्रिय रमेश लाडखेडकर

सप्रेम नमस्कार वि.वि.

आपले पत्र मिळून बरेच दिवस झाले, उत्तर पाठवण्यांस उशीर होत आहे, त्या बद्दल क्षमस्व.

पक्षी मित्र संमेलनाच्या स्वरुपाचा फेर विचार व्हावा या बद्दल मी श्री. विलास पत्की, निर्मलदादा, दिगंबर गाडगीळ, डॉ. विनय ठकार यांचेशी चर्चा केली तर डॉ. सुभाष आठले कोल्हापूर यांचे पत्र वाचले.

या सर्वांशी चर्चा केल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती अशी की, आपण सर्वांनी एकत्र बसून विचार करावयास हरकत नाही. ठिकाण मध्यवर्ती असावे, म्हणजे सर्वांना सहज येता येईल. तेंव्हा औरंगाबाद हे मध्यवर्ती असल्याने आपण सर्वांनी औरंगाबाद येथे जमावे असे वाटते. कसे जमेल ते बघावे. आम्ही सर्वांचे स्वागत करण्यांस तयार आहोत. असो..

आता पर्यंत झालेल्या संमेलनात आपण बरेच कांही मिळवू शकलो आहोत परंतु संशोधन अथवा अधिक अभ्यास व्हावा या दृष्टीने त्या मानाने प्रगती काहीच नाही. (नाशिक येथे श्री. प्रकाश गोळे यांनी आयोजित केलेले चर्चासत्र वगळता) मला वाटते त्याच प्रमाणे दर संमेलनामध्ये एक दिवसाचे चर्चा सत्र नाशिक येथे आयोजित केल्या प्रमाणे असावे. इत्यादि अनेक बाबीं वर विचार विनिमय करण्या करता आपण सर्वांनी एकत्र बैठक घेणे आवश्यक आहे.

दि. : ८ - ९ - ८७

आपला
दिलीप यार्दी

श्री लाडखेडकर व डॉ. रमेश बिडवे यांस, सप्रेम नमस्कार,

आपल्या दोघांची ही पत्रे मिळाली. त्यातून मला जे काय वाटते ते लिहण्याचा प्रयत्न करतो. अर्थात मी व्यक्तीशः या बाबतीत अनुभवाने वयाने ही तसा लहानच म्हणायास हरकत नाही पण विचार करावयास हरकत नाही.

७ महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलने झाली म्हणजे ती दर वेळी होत गेली - त्यात काही उणीवा म्हणा काही विसंगती म्हणा जरुर झाल्या असतील पण त्या निमित्ताने मला जे फायदे जाणवतात त्याचा विचार जरुर व्हावा.

१) याच निमित्ताने बरेच पक्षी प्रेमी - निसर्ग प्रेमी आपण दरवेळी भेटत गेलो.

२) यात काही अभ्यासू व्यक्तींची पण ओळख झाली.

३) काही जण केवळ सहली खातर आले असतील कदाचित पण त्यांनाही या नव्या विषयाची ओळख जरुर झाली असेल. काहिंना आवडही !

४) ठिकठिकाणच्या जलाशयांवर येणाऱ्या पाणपक्षांची व बागेतील पक्षांची एकमेकास ओळख झाली.

५) काही जालाशयांना संरक्षण मिळविण्याच्या दृष्टीने जे प्रयत्न झाले त्याची शासनाने पण दखल घेतलीच मला वाटते अशा संमेलनांचा फायदा जरुर होतो हो ! त्यातल्या काही अभ्यासू मंडळींनी स्वतंत्रपणे एकत्रित येऊन संशोधनात्मक प्रयत्न जरुर करावेत त्यासाठी एकत्रित ही यावे अवश्य यावे, पण मला असेही वाटते की संम्मेलना सारखे (आपण वेगळे नाव द्या वाटल्यास) अनेकांना एकापर्यंत येण्याची संधी अवश्य द्यावी.

एक आणखीन सुचवावेसे वाटते की अशा संमेलनातून जर काही चुका, तोटे, किंवा निष्क्रियता येत असेलच तर त्याची जाहीर चर्चा (लेखनातून पत्रकातून) होण्या पेक्षा आपल्या संबंधितांपुरतीच ती मर्यादित रहावी म्हणजे अनेक निसर्ग मित्र पक्षीमित्र मिळण्यास अडचण येणार नाही.

छोटी Get Together घेण्यासाठी जागा शक्य तर नवी असावी एक नवीन क्षेत्र पहावयास मिळेल कोकणची कल्पना चांगली आहे. बीड येथे विलास पत्की बदलून गेले आहेत त्यांनी पण एकत्रित यावे असा आग्रह केलेला आहे. इ.

संमेलनातून किंवा एकत्रित येण्यातून माझ्या मते काही अडचणी, तोटे जमेस धरुन ही नवीन उत्साह नवीन क्षेत्र काही नवा लाभच अधिक असावा असे मला वाटते. (मी काही ठिकाणीच आल्याने पूर्ण अनुभव नाही)

२० ऑगस्ट ८७

आपला एक पक्षीमित्र

निर्मल दादा

श्री रमेश लाडखेडकर

स.न.वि.वि.

आपले १०-७ चे पत्र मिळाले. लोणावळा येथील पक्षीमित्र संमेलनाच्या वेळी मराठी भाषिक पक्षी निरिक्षकांनी वर्षातून एकदा एकत्र यावे, आपल्या अनुभवांची देवाण घेवाण करावी संमेलना जवळच्या स्थळी पक्षी निरिक्षण करावे एवढी माफक अपेक्षा होती त्यातही पक्ष्यांची मराठी नावे निश्चित करावी, मुलांच्या अभ्यासक्रमात निसर्ग विषयक शिक्षणास स्थान असावे असे काही उद्देश पुढे ठेवले गेले होते. त्या नंतर औरंगाबादच्या संमेलना पासून सहल स्लाईड शो काही निबंधवाचन व किरकोळ चर्चा असे उत्सवी स्वरुप येवू लागले.

सोलापूरच्या संमेलनानंतर महाराष्ट्रात ठिकठिकाणी असणाऱ्या मंडळांनी एखादा संघ स्थापन करुन संघटनात्मक कार्य हाती घ्यावे, अधिवेशनाचे स्वरुप असेच काहीसे उत्सवी असावे व गंभीर अभ्यास करणारां साठी वेगळी शिबीरे आयोजित करावीत असा सूर निघू लागला. त्यासाठी पुण्याला बैठक घेवून घटना वगैरे तयार करावी, संघटना नोंदवून घ्यावी असे ठरले. नाशिककर मंडळींनी घटनेचा आराखडा करण्याची जबाबदारी घेतली.

नाशिकच्या अधिवेशनाचे स्वरुप बरेचसे उत्सवी असले तरीही जिल्हावार प्रतिनिधी नेमून पुणे येथे मध्यवर्ती संघटना स्थापन करावी असे ठरले. त्यानंतर वर्ष भरात पुणेकरांनी त्याकडे लक्ष दिले नाही. येवढेच काय, पण अधिवेशनात देखील असे काही गेल्या वर्षी ठरवले होते. त्याचे काय झाले याबद्दल कोणी आठवण ही काढली नाही !

अडचण मुख्यतः नियमितपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा अभाव हीच आहे. या पार्श्वभूमीवर संमेलना बाबत समग्र विचार व्हावा ही सूचना स्वागतार्ह आहे.

आपण नक्की काय करु इच्छितो व काय करु शकू याबद्दल मला वाटते आपणास माहित असलेल्या संस्थांच्या दोन दोन प्रतिनीधींनी व व्यक्तिनींही एकत्र येवून चर्चा करावी. मला वाटते नोव्हेंबर डिसेंबर फार उशीर होईल. कारण ठाणेकरांनी आमंत्रण दिले आहे. त्या प्रमाणे संमेलन करावे की नाही. त्याचा विचार होऊन संमेलन घ्यावयाचे असल्यास त्यांना भरपूर अवधी दिला पाहिजे. करीता अशी चर्चा सप्टेंबर च्या पूर्वार्धात व्हावी व निर्णय ठाणेकरांना कळावा. त्यांनी तयारीला सुरवात केली का नाही ठावूक नाही. पण ते संमेलन घेणार नसतील तर बीडला संमेलन घेण्याची तयारी श्री विलास पत्की यांनी दाखविली आहे.

नाशिक संमेलनाचा निमंत्रक म्हणून ते काम स्थानिक पंक्षी मित्र मंडळाच्या वतीने मी करीत होतो. माझे मत त्या मंडळाचे असेलच असे नाही. तथापी आपले पत्र व माझे उत्तर संबंधित पदाधिकाऱ्याकडे जावून त्यांची प्रतिक्रीया आपल्याला कळेलच.

गावो गावच्या किमान एकेका प्रतिनिधीस प्रत्सुतच्या सभेचे निमंत्रण पाठविणे असल्यास कळवावे. म्हणजे माझ्या संग्रहीचे पत्रे पाठविन.

एका घुटमळणाऱ्या प्रश्नाला चालना दिल्या बद्दल धन्यवाद !

दिनांक : २४-७-८७

आपला

दिगंबर गाडगीळ




उद्घाटक - श्री. मारुती चितमपल्ली बोलातांना बसलेले (डावीकडून) संमेलनाध्यक्ष श्री. रमेश लाडखेडकर, श्री. सी. एस. किर्पेकर व श्री. अजय डोळके




प्रथम विदर्भ संमेलन - एक चर्चासत्र




प्रथम नागपूर शहर पक्षिमित्र संमेलन स्वागत पर बोलतांना - श्री. रायगावकर बसलेले - उद्घाटक प्रा. श्री. खरात व डॉ. श्री. म. भा. निसळ.




व्दितीय नागपूर शहर पक्षिमित्र संमेलन कोराडी पक्षि-अधिवासा विषयी माहीती देतांना - श्री. अनिल महाजन बसलेले - श्री. प्रद्युम्न सहस्त्रभोजनी.




उद्घाटक - श्री. राम इंदुरकर, बोलतांना - मंचावरील अन्य उपस्थित (डावीकडून) श्री. चितमपल्ली, श्री. गिरीश गांधी, डॉ. श्री. रमेश बिडवे तथा विशेष अतिथी श्री. माधवराव पाटील



१२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे उद्घाटन करतांना - महाराष्ट्राचे मुख्य वनसंरक्षक (वन्यप्राणि) श्री राम इंदुरकर.



निसर्ग सेवा संघाचा 'निसर्गसेवा' पुरस्कार स्वीकारतांना श्रेष्ठ पक्षिमित्र श्री. व्ही.सी. आंबेडकर तथा समारंभाचे अध्यक्ष श्री. मारुती चितमपल्ली



समारोप सत्र - कृतज्ञता व्यक्त करतांना संयोजक श्री. रमेश लाडखेडकर

प्रिय रमेश लाडखेडकर

संमेलन आणि तदनुषंगाने सर्वश्री लाडखेडकर, बिडवे, निर्मलदादा, गाडगीळ, यार्दी यांनी आपले विचार मांडले आहेत. मला काय वाटते ते थोडक्यात लिहीत आहे.

संमेलन हा प्रायः सोहळा आहे. त्यामध्ये जुन्या मित्रांच्या भेटी-गाठी, गप्पा-चर्चा, नवीन मित्र जोडणे, नव्या लोकांना पक्षी-निरीक्षणात ओढणे, सर्वांना ज्या गोष्टी पटल्या आहेत, त्यावर एकत्रित संख्येने जोर देणे, ज्यांनी काही विशेष कामगिरी वा कौशल्य दाखविले असेल, त्यांची इतरांना माहिती करुन देणे व काही घटका सर्वांनी आनंदात घालविणे, एकमेव फायदे अपेक्षित असावे. यापेक्षा मौलिक गोष्टींची संमेलनातून अपेक्षा करु नये.

आता पर्यंत स्थानिक मंडळींच्या पुढाकाराने ठिकठिकाणी संमेलने भरली. यावर्षी जोराने असा कोणाचाच पुढाकार असल्याचे जाणवले नाही. असा जोराचा पुढाकार कोणी घेत असेल तर अजूनही असे संमेलन होऊ शकेल. नेहमीचा सोहळा जरुर व्हावा.

इतर मौलिक गोष्टींसाठी उदा. पक्षी-निरीक्षणातील बारकावे, काही विशिष्ट गोष्टींची माहिती देणे-घेणे, एकत्रित करणे, नवीन संशोधन व त्यावर चर्चा, यासाठी वेळोवेळी शिबिरे भरविण्याचे आपण ठरविले डॉ. सामंत तसे पहिले शिबीर घेणारही होते. दुदैवाने ते झाले नाही. पण अजून होऊ शकते. लाडखेडकर व यार्दी यांनी तशी तयारी दर्शविली आहे. मात्र या शिबिरात संघटनात्मक बाबींची चर्चा न करता, पक्षी-निरीक्षण कसे सुधारता येईल, महाराष्ट्रातील पक्ष्यांबद्दल माहिती कशी एकत्र होईल, नवीन संशोधन कोणते आणि कोण कोण करणार आहे, याबाबतीत माहितीची देवाण-घेवाण कशी होईल, ही चर्चा करावी. महाराष्ट्रातील देवाण-घेवाण कशी होईल, ही चर्चा करावी. महाराष्ट्रातील कोणत्या पक्ष्यांबद्दल, कोणत्या प्रकारची माहिती आपल्याजवळ नाही, याची एक यादी मी प्रसारीत केली आहे. शिबीराला येणाऱ्यांनी आपल्याजवळ जी माहिती आहे ती बरोबर घेऊन यावे म्हणजे ती शिबिरातच एकत्रित होऊन महाराष्ट्रातल्या पक्ष्यांविषयीचे संकलन सुरु होईल. पर्यावरणाच्या इतर प्रश्नांवरही समान भूमिका या शिबिरात तयार व्हावी.

दिनांक : २१-९-८७ — प्रकाश गोळे



# गोमांतक संमेलन

मध्यवर्ती समितीच्या नाशीक बैठकीत ठरल्यानुसार मध्यवर्ती समितीचे संयोजक श्री रमेश लाडखेडकर यांनी गोवासंमेलनाचे आयोजक तथा मा. अध्यक्ष डॉ. श्री. रमेश बिडवे व अन्य संबंधित पक्षिमित्रांशी संमेलनाच्या स्वरुपासंबंधी चर्चा केली. या चर्चेतून ऊभरलेली गोवा संमेलनाशी संकल्पना संक्षिप्तरित्या नोंदविली आहे. — संपादक

प्रिय पक्षिमित्र,

एक तपाच्या प्रवासानंतर पक्षिमित्र संमेलनाचे यंदा सीमोल्लंघन केले आहे. १३ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन ७ ते ९ जाने. ९४ दरम्यान गोव्यात संपन्न होत आहे. एका अर्थाने हे प्रथम बृहन महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन होय. सर्व सहभागी पक्षिमित्रांचे गोमांतक आयोजन समिती तथा मध्यवर्ती समितीच्या वतीने, हार्दिक स्वागत.

आजवरच्या संमेलनातील चर्चासत्रांची आखणी सर्वस्वी स्थानिक आयोजन समिती करित असे. या संमेलनातील चर्चासत्रांची आखणी स्थानिक आयोजन समिती तथा मध्यवर्ती समिती यांनी संयुक्तपणे केली आहे. महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचा हा संयुक्त उपक्रमाचा पहिला प्रयोग आहे. आपण सर्वांमिळून हा संयुक्त उपक्रम यशस्वी करुया.

आयोजकांनी चर्चा-सत्रांसाठी पुरेसा वेळ उपलब्ध करुन दिला आहे. संमेलन चळवळीच्या आजवरच्या प्रवासाचे सिंहावलोकन करुन सद्य स्थितीचा तपशीलाने आढावा आपल्याला घेता येईल. प्रथम चर्चासत्रात हे साधता येईल. पक्षी जगात विषयीची अभ्यासपूर्ण मांडणी काही अभ्यासक करणार आहेत. गोव्यातील पक्षी जीवना विषयीचे टिपणे हे सहभागींसाठी प्रमूख आकर्षन ठरावे. सामान्यपणे द्वितीय सत्र या साठी उपलब्ध असेल.

तृतीय चर्चासत्र 'पाणवठे आणि पाणपक्षी गणना' या संबंधतील टीपणे व चर्चेसाठी राखून ठेवण्याचा मानस आहे. महाराष्ट्रासाठी आजवरची पाणपक्षीगणना आणि या कार्यक्रमाची भविष्यातील दिशा ठरविण्यासाठी या चर्चेचा उपयोग होईल. आणि या चर्चेतून 'जलामयभूमि' विषयाचे आपले आकलन अधिक प्रगल्भ होईल अशी अपेक्षा आहे.

पक्षिमित्र चळवळ अधिक संघटीत व्हावी यासाठी १२ व्या संमेलनात आपण मध्यवर्ती प्रयत्नांच्या यशापयशाचा आढावा व या निमित्ताने एकूणच महाराष्ट्रातील पक्षिमनांच्या संघटन विषयक धडपडीचे मुल्यांकन करुन भविष्याती दिशा निश्चित करण्याचा प्रयत्न चवथ्या सत्रात व्हावा असे अभिप्रेत आहे.

'अनौपचारिक गप्पा' हे या संमेलनातील विशेष आकर्षन ठरावे. पक्षिनिरिक्षणातील वैशिष्ट्यपूर्ण अनुभवांची देवाणघेवाण शंकानिरसन, प्रश्नोत्तरी, मुलाखती, स्लाईड शोज किंवा अगदी गप्पा गोष्टी यासाठी आयोजकांनी दोन संध्याकाळी राखून ठेवल्या आहेत. यांचा मनसोक्त लाभ घेऊया.

पक्षी निरीक्षणासाठीच्या करमाळी तलावावरील भ्रमंती आणि मांडवीतील नौकानयन ही आनंदाची पर्वणी ठरावी. महाराष्ट्रभराच्या अंतर्भागातून आलेल्या पक्षिमित्रांना समुद्रकिनाऱ्यावरील पक्षी बघण्याची दुर्लभ संधि यात मिळणार आहे. आपण सारेच यासाठी ऊत्सुक आहोत.

पक्षिमित्र चळवळ मराठी माणसांना जोडणारी चळवळ आहे. गोव्यापासून गोंदिया पर्यंतच्या मराठी भाषिकांना स्वप्न संयुक्त महाराष्ट्र चळवळीने बघितले होते. किमान पक्षिमित्र चळवळीच्या व्यासपीठावर हे स्वप्न साकारुया. गोव्याच्या 'निसर्ग मित्र' ने एक संधि उपलब्ध करुन दिली आहे. त्यांचे हार्दीक अभिनंदन!

समस्त पक्षिमित्रांना नववर्ष शुभेच्छा !

मध्यवर्ती समिती

महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन चळवळ

# पक्षी अभ्यास - एक संकल्पना

प्रकाश गोळे

नागपूरच्या १२ व्या पक्षिमित्र संमेलनाच्या निमित्ताने सर्वश्री प्रकाश गोळे यांनी हे टिपण संयोजकांकडे पाठविले होते. संमेलनाच्या पाठपुराव्याचा उपक्रम म्हणून साऱ्या महाराष्ट्रातील पक्षिमित्रांनी यात सुचविलेला अभ्यासाचा कार्यक्रम स्वीकारावा अशी आयोजकांची अपेक्षा होती. पक्षिविषयक शास्त्रीय अभ्यासाची कास धरणारे जागतिक पातळीवरील अभ्यासक तथा संस्था या प्रकारचे उपक्रम राबवित आहेत. महाराष्ट्रातील पक्षिमित्रांनीही या दिशेने वाटचाल सुरु करायला हवी असे आम्हाला वाटते म्हणून आवर्जून हे टिपण या अंकात प्रकाशित करीत आहोत. — संपादक

१२ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन नागपूरला संपन्न होत आहे, ही गोष्ट फार आनंदाची आहे. महाराष्ट्रापुरता विचार केला तर पक्ष्यांची विविधता जेवढी विदर्भात बघायला मिळते, तेवढी अन्य भागात आढळणार नाही. या साऱ्यांना साक्ष ठेवून आपण नागपूरात एकत्र येणार आहोत, ही गोष्ट पक्षीजगतात समाधान पसरविणारी असेल अशी कल्पना करायला हरकत नाही. मी मात्र समाधान व असमाधान यांच्या सीमारेषेवर आज उभा आहे. पक्षीमित्र संमेलनाने एक दशक पूर्ण केले; अकरा वर्षानंतरही पक्ष्यांविषयीची ही मळमळ तग धरुन आहे, ही गोष्ट समाधान देणारी आहे. पण या अपत्याच्या शारीरिक आणि मानसिक वाढीविषयी मात्र मी स्वतः असमाधानी आहे.

पक्षीनिरीक्षणातून मिळणारा आनंद समानशीलांबरोबर पुन्हा एकदा अनुभवावा, या इच्छेने आपण एकत्र आलो. हा आनंद नवनविन पक्षी हुडकण्याचा होता, नविन गोष्टींच्या नोंदी करण्याचा होता, भ्रमंतीचा होता आणि पक्ष्यांच्या छायाचित्रणासारख्या जोड गोष्टींचाही होता. त्याला पुढे दुर्मिळ पक्षी आणि त्यांचे निवास यांच्या संरक्षणासाठी आवश्यक अशा प्रयत्नांची जोड मिळाली. या सर्व बाबतीत गेल्या ११ वर्षात काही उल्लेखनीय गोष्टी केल्या गेल्या. त्यांची नोंद इथे करणे योग्य ठरेल. पुणे आणि नागपूर या शहरांत व त्यांच्या परिसरात आढणाऱ्या पक्ष्यांच्या याद्या, पक्ष्यांच्या आढळ-वैशिष्टयांसह प्रसिध्द झाल्या. औरंगाबाद संमेलनाने जायकवाडी जलाशयातल्या पक्ष्यांकडे लक्ष वेधून तेथे पक्षी-अभ्यारण्य करण्याच्या प्रयत्नांना चालना दिली. सोलापूर संमेलनाने हीच गोष्ट महाराष्ट्रातील माळढोक पक्ष्यांच्या अभ्यारण्याच्या बाबतीत केली. महाराष्ट्रातील इतर दुर्मिळ पक्ष्यांकडेही शासनाचे आपण लक्ष वेधले. नाशिक संमेलनाने नांदूर-मध्मेश्वरकडे लक्ष वेधले तर पुण्यातील संमेलनाने उजनी व आसपासच्या जलपक्ष्यांच्या निरीक्षणास चालना दिली. मालवण व हरिहरेश्वर येथील संमेलनांनी कोकण पटटीतील आणि सागरी पक्ष्यांच्या निरीक्षणाचे महत्व नोंदविले.

पक्षीमित्रांनी महाराष्ट्रा बाहेरसुध्दा पक्षीनिरीक्षणासाठी सफरी केल्या आणि आपले अनुभव संमेलनातून व इतर प्रसार माध्यमातून नोंदविले. काही पक्षीमित्रांनी पक्ष्यांच्या छायाचित्रणात उत्तम प्रगति साधून स्लाइड्सद्वारे त्यांचा आनंद इतरांना दिला. पक्ष्यांच्या सवयी, त्यांचा प्रादेशिक आढळ, एवढेच नव्हे तर पक्षी-अभ्यारण्याचे व्यवस्थापन या विषयांवर काही चांगले निबंधही संमेलनातून सादर झाले. पक्षीमित्रांची प्रादेशिकच नव्हे तर राज्यस्तरावरची संघटना बांधण्याचाही आपण प्रयत्न केला. पक्ष्यांचा अभ्यास, संरक्षण व संवर्धन आणि त्यासाठी आवश्यक एकजूट व संघटना यांबददलचे विचारमंथन तर प्रत्येक संमेलनातून आपण करीत आलो आहोत. एवढे विविध विषय आपण हाताळले असताना मला असमाधान का वाटावे, असा प्रश्न मी स्वतःलाच अनेकदा विचारीत असतो.

या. प्रश्नाचा थोडे अंतर्मुख होऊन मी जेव्हा विचार करतो, त्यावेळी जाणवते की या सर्व प्रयत्नातून महाराष्ट्राच्या

पक्षीजीवनाचे सर्वंकष चित्र अजून आपण उभे करु शकलो नाही. सालिम अली आणि डिलन रिप्ले यांच्या ग्रंथातली माहीती आणि हुमायून अब्दुलअली यांनी प्रसिध्द केलेली महाराष्ट्रातील पक्ष्यांची यादी यांचा पुनर्विचार करण्याची वेळ आता आलेली आहे, असे माझे मत आहे. याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील स्थळवैशिष्टयांमध्ये आपण घडवून आणत असलेले बदल. औद्योगिकीकरण, नागरीकरण, शेतीचा व वनशेतीचा विकास, पाळीव जनावरांची वाढती संख्या, पर्यटन व तत्संबंधित उद्योगांचा विकास यांच्यामुळे महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा झपाटयाने बदलतो आहे. पक्ष्यांच्या विविधतेत, संख्येत व आढळात त्यामुळे निःसंशय बदल होत असणार. या बदलाची सतत नोंद होत राहीली पाहीजे, असे मला वाटते. महाराष्ट्रातील पक्ष्यांची सर्वांगीण पाहणी पुन्हा एकदा करण्याच्या उददेशाने मी एक प्रश्नावली प्रसृत केली होती. पण तिला प्रतिसाद मिळाला नाही. सुदैवाने जलपक्ष्यांची गणना आपण दरवर्षी करतो. त्यामुळे काही विशिष्ट पक्ष्यांच्या आढळाची माहीती एकत्रित होऊ लागली आहे. हीच गोष्ट इतर पक्ष्यांच्या बाबतीत का करता येऊ नये ? यासाठी नागपूरच्या संमेलनात पुढील काही गोष्टींची आपण चर्चा करु या असं मी सुचवितो

१. महाराष्ट्रात आढळणाऱ्या पक्ष्यांची आपण निरनिराळया समूहात विभागणी करु या. हे समूह मी अशा रीतीने कल्पिले आहेत की एकेका समूहातल्या पक्ष्यांची माहीती एकत्रितपणे जमविणं, नोंदी ठेवणं पक्षीनिरीक्षकांना सोप व्हावं. प्रत्येक पक्षी-निरीक्षकाने आपल्याला जो आवडतो तो समूह निवडावा. म्हणजे पक्षीनिरीक्षकांचीही समूहाप्रमाणे विभागणी होईल. एका पक्षीनिरीक्षकाला एका किंवा अनेक समूहांचे सदस्यत्व स्विकारता येईल. संमेलनात प्रत्येक समूहाचा एकेक समन्वयक नेमला जावा. समूहातील सदस्यांनी समन्वयकांकडे आपण जमविलेली माहीती पाठवावी. दरवर्षी हे समन्वयक आपपल्या समूहाचा अहवाल तयार करतील आणि संमेलनात सादर करतील. ज्याचा अहवाल उत्कृष्ट ठरेल, त्या समूहाला बक्षिस देण्याची योजना ही तयार करावी.

२. पक्ष्यांविषयीची सर्व माहिती जिथे एकत्रित होईल असे राज्यपातळीवरचे एक माहीती केंद्र संमेलनाने स्थापन करावे. राज्यातील मध्यवर्ती ठिकाणी ते असावे व ते मिळविण्याची जबाबदारी स्थानिक पक्षीमित्र संस्थेने स्विकारावी. सर्व समूहांचे अहवाल या केंद्राकडे सुपुर्द करावे. पक्षीमित्रांनी स्वतः लिहीलेल्या टिपण्यांच्या, लेखांच्या, पुस्तकांच्या २ किंवा ३ प्रती या केंद्रास भेट म्हणून पाठवाव्या. ज्या कोणास माहिती किंवा प्रती हव्या असतील, त्यांना काही शुल्क घेऊन केंद्राने त्या पुरव्याव्या. माहिती एकत्रित संकलित करुन ती प्रसिध्द करण्याचे काम सवडीनुसार या केंद्राने करावे.

मी सुचविलेल्या समुहांमध्ये जलपक्ष्यांचा समावेश केलेला नाही. या पक्ष्यांची गणना करण्यात जास्तीत जास्त निरिक्षकांनी भाग घ्यावा आणि आपण भरलेल्या फॉर्मची झेरॉक्स प्रत मध्यवर्ती केंद्राकडे पाठवावी. म्हणजे ही माहीतीही संकलित होईल.

महाराष्ट्रातील पक्षीजीवनाचे सर्वंकष चित्र तयार होण्याच्या दृष्टीने वरील दोन गोष्टी मला आवश्यक वाटतात. त्याचे यश अर्थातच पक्षीनिरीक्षक किती उत्साहाने निरीक्षणांची नोंद करुन ती पाठवितात, त्यावर अवलंबून राहील.

मित्र हो । महाराष्ट्रातली आपली ही चळवळ, ही संमेलने हे संघटित प्रयत्न भारतात अपूर्व आहेत. इतर कोणत्याही राज्यात त्यांची द्विरुक्ती झालेली नाही. तेव्हा आपण सर्व मिळून हे अपूर्व प्रयत्न असेच चालू ठेवू या. आपला सर्वांचा पक्षीनिरीक्षणातील आनंद दृढ व्हावा हीच इच्छा .

निरनिराळया समूहात पक्ष्यांची विभागणी :

१. काइट्स्, हॉक्स, बझर्ड, व्हल्चर्स

२. हॉक-ईगल, ईगल, हॅरिअर, फाल्कन्स

३. नाईटजार-आऊल

४. हॉर्नबिल, बार्बेट, वूडपेकर

५. स्वॉलो, स्विफ्ट मार्टिन

६. स्पॅरो, वीव्हर बर्डस्, मुनिआ, रोझफिंच

७. लार्क, पिपिट, वॅगटेल, कोर्सर, सॅन्डग्राऊज, बस्टर्ड, फ्लोरिकन

८. मैना, पिजन्स, डव्हज, पॅरकीट, ककू, हॉक-ककू, ककू-श्राईक, क्रो-फेझंट

९. वॉर्बलर्स-रेन वॉर्बलर्स

१०. श्राईक, बी-ईटर, रोलर, किंगफिशर्स

११. थ्रश, ब्लॅकबर्ड, शामा, व्हिसालिंग थ्रश, चॅट

१२. क्लोरोप्सिस, बुलबुल, ड्रोंगो, ट्रीपाय, हुपो

१३. बॅबलर, फ्लायकॅचर, मिनिव्हेट, ओरिओल

१४. टिट, नटहॅच, सनबर्ड, फलॉवरपेकर, व्हाइट आय, आयोरा

(अगदी सर्व नाही तरी महाराष्ट्रात आढणाऱ्या प्रमुख जातींचा वरील समूहांमध्ये समावेश केला आहे. नागपूर संमेलनात जरी वरील सर्व समूहांसाठी समन्वयक निवडले गेले नाहीत तरी हरकत नाही. जेवढया समूहांसाठी सभासद मिळतील त्यांचे काम सुरु व्हावे.)



# पक्षी निरीक्षण आणि ज्ञानेश्वरी

वासुदेव चोरघडे

पक्षांविषयीचा शास्त्रीय अभ्यास मानवी संस्कृतीच्या संदर्भाशिवाय अपूर्ण ठरण्याचा संभव असतो. म्हणून पक्षिमित्रांनो साहित्य, लोकवाड.मय, दर्शनशास्त्र आदिंमधील पक्षिविषयक किंबहुना एकुणच निसर्ग विषयक मौलिक चिंतनाचा परिचय असणे अभिप्रेत आहे. ज्ञानेश्वरीतल्या चिंतनाचा अल्पांश परिचय ज्ञानेश्वरांचे व्यासंगी अभ्यासक श्री. वासुदेवराव चोरघडे यांनी करुन दिला आहे. — संपादक



परवा एक लेख वाचला. काही निसर्गसेवी मित्रमंडळानी केलेल्या पक्षी-निरीक्षणाचा त्यात वृतांत होता. निसर्गाच्य रम्य सान्निध्यात जीवसृष्टीची विविधता बघण्याचा आनंद आपण अनुभवू शकलो नाही याची खंत वाटली. या मंडळींसारख उत्साह आणि स्थिती आपली राहिली नाही; घरीच पक्षी - निरीक्षणाचा लाभ घेता येऊ शकेल काय याचा विचार करीत बसलो, तो आठवला उपनिषदाचा एक मंत्र -

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्ष परीषस्वजाते
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्ति अनश्नन् अन्यो अभिचाकशीती ।।

मुण्डकोपनिषदातील हा मंत्र आहे. याचा स्थूल आशय असाः दोन्ही पक्षी सदा जवळ राहणारे, मित्र असलेले, समान वृक्षाचा आश्रय करुन राहतात. त्या दोन पक्ष्यांपैकी एक गोड फळे खातो आणि दुसरा न खाता तटस्थपणे पाहत असतो. या मंत्रापुढील मंत्र सांगतो की एकाच वृक्षामध्ये पुरुष निमग्न आहे. तो अनाथपणे मोहित होऊन शोक करतो. त्या दुसऱ्या तटस्थ, समर्थ पक्ष्याला पाहतो तेव्हा वीतशोक होऊन महिमा प्राप्त करतो.

समाने वृक्षे पुरुषो निमग्नः अनीशया शोचति मुह्यमानः
जुष्टं यदा पश्चति अन्यमीश अस्य महिमानमिति वीतशोकः ।।

हा वृक्ष कोणता, हे दोन पक्षी कोणते ? त्यापैकी एक वृक्षाची फळे खाणारा. ती गोड लागली की आनंद मानणारा. कडू लागली की दुःख करणारा. न मिळाली तर व्याकुळ होणारा. अनूकूलतेत सुखी आणि प्रतिकूलतेत दुःखी होणारा. दुसरा अगदी वेगळा. याविषयी उदासीन, समर्थ आनंदी. दोन्ही पक्षांचे क्षेत्र एकच. या वृक्षाच्या वरच्या फांदीवरील तटस्थ पक्ष्याकडे जेव्हा फळे खाणारा पक्षी पाहतो तेव्हा त्या शांत धीरगंभीर पक्ष्याविषयी त्याला कुतूहल वाटू लागले. हा सुखदुःखाच्या वृत्तींपासून दूर असलेला पक्षी कोणता ? त्या दिशेने या पक्ष्याची वाटचाल सुरु होते. अनेक वर्षांची त्याची फळे चाखण्याची, सुखी किंवा दुःखी हाण्याची संवय सहजासहजी काही जात नाही, जमेल तेवढे त्यापासून वेगळे होत त्याचा पुढचा प्रवास चालू असतो. प्रयत्नानंतर जेव्हा तो त्या वरच्या पक्ष्याच्या अगदी निकट पोहचतो तेव्हा लक्षात येते की वृक्षावर आपल्याशिवाय आणखी कोणीही नाही. आपण नित्य आहोत, वृक्षच अनित्य आहे. जीवात्म्याची अशी परमश्रेष्ठ आत्मतत्वाशी भेट उपनिषद्कारांनी सांगितली आहे.

ज्ञानेश्वरांनी सुद्धा जीवनावश्यक अध्यात्म पक्षी - निरीक्षणाने सुलभ केले आहे. सद्‌गुरुच्या कृपेने विवेक लाभला की त्या विवेकाच्या पहाटे आतापर्यंत हे देहरुपी घरटयात अडकलेले जीवपक्षी आपली संकुचित घरटी सोडून व्यापक ज्ञानाच्या आकाशात प्रविष्ट होतात -

जेणे विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे ।
सांडिती देहांहतेची अविसाळे । जीवपक्षी ।। (अ. १६-३)

विवेकाच्या उदयाने या जीवपक्ष्याला आत्मज्ञानाचे डोळे प्राप्त होतात. ही नवी दृष्टी प्राप्त झाली की जीव देहतादात्म्याची घरटी सोडून देतात. बंधनातून मुक्त होण्याचा उपाय सर्वांना सुलभ व्हावा हे तर ज्ञानेश्वरीचे प्रयोजन -

मग आर्ताचेनि वोरसे । गीतार्थग्रथन मिसे ।
वर्षला शांत रसे । तो ग्रंथु ।। (अ.१८-१७६१)

असा आर्त सद्‌गुरुवर कसे प्रेम करतो ? त्यासाठी सुद्धा ज्ञानेश्वरांना पक्ष्याचा दृष्टांत योजावासा वाटला. हे गुरु-शिष्य प्रेम कसे ?

चक्षुपक्षेवीण । पिलू होय आपण । कैसे पै अपारपण । आवडीचे ।।
गुरुते पक्षिणी करी । चारा धे चांचूवरी । गरु तारु धरी । आपण कास ।। (अ.१३-३९९,४००)

नित्याच्या पक्षी - दर्शनातून सर्व विद्यांत श्रेष्ठ असलेली अध्यात्मविद्या इथे सुलभ झाली आहे. पण ती प्राप्त करुन घेताना हळुवारपणा असणे आवश्यक आहे. त्यासाठी सुद्धा पक्ष्यांचाच आदर्श डोळयांपुढे ठेवून. शरदाच्या चांदण्यातून ओसंडणारे अमृतकण 'चकोर तलगे' ज्या हळुवारतेने धेतात ती मृदुता इथे अपेक्षित आहे. चकोर पक्षी सुद्धा नको, त्याची पिले व्हावे लागणार आहे; कारण इथे 'महाबोधी कोवळीक दुणावली' आहे. हा चकोरपक्षी कुमुददळाच्या ताटात चंद्रामृताचे पान करणारा आहे. चंद्रकिरणतून निघणाऱ्या अमृतधारा त्याला आवडतात. तेच त्याचे अन्न आहे. त्यांनी तो संतुष्ट होतो. यासाठी चंद्राकडे चोंच करुन सारखी प्रतीक्षा करीत असतो.

येरे चकोरे तिये आपुलिये चाडे । चांचू करिती चंद्राकडे ।
तेवि आम्ही विनवू ते थोकडे । देवो कृपासिंधू ।। (अ.९-२३४)

त्याला मिळणाऱ्या अमृतधारा इतरांना दिसत नाहीत. त्याला मात्र त्या मिळतात. त्यांनीच तो पुष्ट होतो.

तरि चंद्रबिंबौनी धारा । निघता नव्हती गोचरा ।
परि एकसरे चकोरा । निघती दोंदे ।। (अ.१३-२७५)

त्याची ही आर्तता आणि निकड चंद्र जाणून आहे.

चातक पक्षी मेघाची अनन्यतेने प्रतीक्षा करणारा आहे. मेघ देईल तेवढेच चार थेंब घेऊन आपली तहान भागविणारा आहे. एऱ्हवी पाण्याला काय तोटा ? सरिता, सरोवर, सागर ही जलाशये तुडुंब भरली असताना सुद्धा हा चातक त्या पाण्याला शिवणार नाही. त्याला हवे मेघातून मिळणारे जलबिन्दु.

भरले सरिता समुद्र चहूंक्रडे । परि ते बापियासी कोरडे ।
कां जै मेघौनि थेंबूटा पडे । ते पाणी की तया ।। (अ. १०-१८३)

ज्ञानाची पुस्तके खूप उपलब्ध आहेत, पण ते गुरुमुखातून मिळावे ही शिष्याची अपेक्षा. सद्‌गुरुशिवाय दुसरी गती नाही, तरणोपाय नाही, ही सद्‌शिष्याची अनन्यता असते. त्याच्यावरील कृपेने जेव्हा गुरुकृपेचा मेघ वळतो तेव्हा चातकाबरोबर इतरांनाही त्याचा लाभ होतोच ना !

चातकाचिये कणवे । मेघु पाणियेसी धावे ।
तेथे चरावर आघवे । निवाले जेवी ।। (अ.१८-१४६८)

अर्जुनाच्या निमित्ताने श्रीकृष्णाच्या मुखातून निघालेले गीताशास्त्र सर्वांच्याच उपयोगाला आले ना !

तैसे अर्जुनाचेनि व्याजे । गीता प्रकाशूनि श्रीराजे ।
संसारायेवढे थोर ओझे । फेडिले जगाचे ।। (अ.१८-१४७०)

एका चातकाच्या अनन्य भक्तीत जगाचे दुःख नाहीसे करण्याची क्षमता असते. एका वासराच्या प्रेमासाठी सुटलेल्या पान्हयातून घरात दुधाचा सुकाळ होऊन जातो.

आपल्या निरीक्षणात याही गोष्टी यायला हव्या.

चातक, चकोराच्या निरीक्षणानंतर योग्य आणि अयोग्य, श्रेय आणि प्रेय, आत्मा, अनात्म याचा निवडा करण्यात निष्णात असलेला, ज्ञानदेवांनी परीचित करुन दिलेला दूसरा पक्षी राजहंस. या विश्वात विश्वात्मा व्यापलेला आहे असे संत सांगतात. आपल्याला तो प्रत्यय येत नाही. नामरुपात्मक विश्व आणि विश्वात्मा एकरुप झाले आहेत. त्यातील नेमके ईश्वरतत्व कसे निवडायचे ? ज्ञानदेव सांगतात - राजहंसाचे निरीक्षण करा.

सलिली पय जैसे । एक होऊनि मीनले असे ।
परी निवडूनि राजहंसे । वेगळे कीजे ।। (अ.२-१२६)

दुधात असलेले पाणी वेगळे करुन घेतो. ती वृत्ती बाणली की ज्ञानविज्ञानाचाही भेद समजेल.

परि तेचि एसेनि निवाडे । जैसे भेसळले खरे कुडे ।
मग काढिजे फाडोवाडे । पारखूनिया ।। (अ.९-४३)
कां चांचूचेनि सांडसे । खांडिजे पय पाणी राजहंसे
तुज ज्ञान विज्ञान तैसे । वाटूनि देऊं ।। (अ.९-४४)

जीवनात कितीतरी वेळा द्वंद्वांना सामोरे जावे लागते. खरे-खोटे, न्याय-अन्याय, पवित्र-अपवित्र, चांगले-वाईट अशी ही द्वंद्वे असतात. या प्रसंगी योग्य ते निवडून घेण्याची क्षमता ज्याला साधली तो तर नित्य आणि अनित्य वस्तूचा विवेक क्षणाचाही विलंब न लागता करु शकेल.

आणि अनात्मवर्गनीर । सांडूनि आत्मरसाचे क्षीर ।
चरताति जे सविचार । राजहंस ।। (अ.१५. २९६)

जीवनात उत्तमाचा, चांगल्याचा स्वीकार करण्याची संवय राजहंसाच्या निरीक्षणातून आपल्याला लाभली तर आनंदाची गुरुकिल्लीच लाभली म्हणायचे. काही झाले तरी अमंगलाचा स्वीकार करायचा नाही, ही तत्वनिष्ठा राजहंस सहजतेने सर्वांसमोर मांडीत असतो. शेवाळाचा थर असलेल्या पाण्याकडे तो ढुंकूनही पाहत नाही.

कां करुनि बाबुळियेची बुंथी । जळे जिये ठाती ।
तयांची व्रास पाहाती । हंस काई ।। (अ १३.३२४)

आज मात्र आपली स्थिती 'कर्दमी रुपला राजहंस' अशी आहे. चक्रवाक हा परस्परावरील नितांत प्रेमाचा आदर्श सांगणारा, ज्ञानेश्वरीच्या विराट आकाशात विहार करणारा आणखी एक पक्षी. परस्परावर नितांत प्रेम करणारे चक्रवाक पक्षाचे युगुल प्रसिद्ध आहे. दिवसभर आपले भक्ष्य शोधताना मावळतीला त्यांची ताटातूट होत. अंधारात प्रियकर - प्रेयसी दुरावतात. एक गंगेच्या या ऐलतीरी तर दूसरा पैलतीरी. एकमेकांना ते दिसत नाहीत. अंधार वाढतो तशी विरहाची व्यथा वाढते. युगासारखी रात्र जाणवते. पण सूर्याच्या पहिल्या किरणाबरोबर विरहाची व्यथा संपते . पलीकडच्या किनाऱ्यावर असलेला आपला सखा दृष्टीला पडतो. प्रकाशाने मीलन घडते. मानवी बुद्धीचेही असेच असते. ती शब्दासाठी प्रतिशब्द गोळा करते आणि अर्थ व ज्ञान मिळविण्याच्या भ्रमात मिरविते. शब्दाचा विश्वरुप अर्थ करुन मात्र ती ज्ञातृपणाने यथार्थ ज्ञानापासून वेगळी होते. हे तिचे दुःख अनादिकालापासूनचे आहे. चित्राच्या आकाशात प्रकाशरुप सूर्याचा उदय झाला की बुद्धी आणि यथार्थ बोधाचे मीलन होते. त्यांचा विरह संपतो.

ज्ञानदेवांचे हे बघा पक्षी - निरीक्षण -

शब्दचिया असकडी । भेदनदीचां दोही थडी ।
आरडाते विरहवेडी । सामरस्याचे समाधान । भोगवी जो चिद्गगन- । भुवनदिवा ।। (अ. १६-५,६)

बुद्धी आणि ज्ञानाची फारकत ज्या प्रकाशाने दूर होते, त्याचा शोध घेण्याचे मार्गदर्शन करणारे हे चक्रवाकाचे जोडपे आहे.

आपण सगळे म्हणतो, परिस्थितीची बंधने प्रगतीला बाधा आणतात. त्यातून बाहेर पडता येत नाही ही सर्वसाधारण तक्रार असते. या बंधनांनी आपण बांधले गेले आहोत की ही बंधने आपणच धरुन ठेवली आहेत याचा विवेक मात्र होत नाही. प्रपंचाने आपल्याला धरुन ठेवले आहे का ? की आपणच प्रपंचाला धरुन ठेवले आहे ? ही बंधने आपल्याला बाहेर पडायाला प्रत्यवाय करतात की मलाच ती हवीशी असल्याने त्यातून मी बाहेर पडत नाही ? या बंधनाच्या जाळयात कोणी मुद्दाम अडकवितो की आपणच त्यात अडकतो हा विचार करण्यासाखा प्रश्न आहे. पोपटाला पकडण्याची एक रीत आहे. एका पोकळ नळीतून दोरी अडकावून तिची टोके झाडाला बांधून ठेवतात. पोपट त्या नळीवर बसला की ती नळी फिरते. पोपटाला वाटते की आपण आता पडतो. तो त्या नळीला घट्ट पकडून ठेवतो. वस्तूत तो मोकळा आहे. त्याला कोणीही धरुन ठेवलेले नसते. त्याच्या घट्ट पकडण्याने तो पारध्याच्या हाती सापडतो. ही आपली बंधनात सापडण्याची रीत ज्ञानदेव पक्षी - निरीक्षणातून मांडतात.

जैसी ते शुकाचेनि आंगभारे । नळिका भेविन्नली एरी मोहरे ।
तरी तणे उडावे परी न पुरे । मानशंका ।।
वायाची मान पिळी । अटुवे हिये आवळी ।।
टिटातु नळी । धरुनि ठाके ।।
म्हणे बांधला मी फुडा । ऐसिया भावनेचिया पडे खोडा ।
की मोकळीया पायांचा चवडा । गोवी अधिक ।। (अ. ६-७६ ते ७८)

असा हा पोपट कारणाशिवाय अडकून पटतो. भावनेच्या, भ्रमाच्या आहारी जातो. स्वतः नळी घट्ट पकडून ठेवतो आणि बंधन निर्माण करुन घेतो. तुटुन गेला तरी जायला तो तयार नाही.

ऐसा काजेवीण आतुडाला । तो सांग पा काय आणिके बांधला ।।

मग न संडी जऱ्ही नेला । तोडुनी अर्धा ।। (अ. ६-७९)

आणि

पाहे पा बांधभावना दृढा । नळीयेंवरी तो बापूडा ।

काय मोकळेयाही चवडा । न ठकेचि पुंसा ।। (अ. १८-३९३)

असा हा पोपट आपलीच मानसिकता । दर्शवित नाही का ? आपणच बंधणाला धरुन ठेवतो आणि त्यात अडकतो. स्वतःचा शत्रू होऊन बसतो.

म्हणऊनि आपणपेया रिपु । जेणे वाढविला हा संकल्पु ।

येर स्वयंबुद्वी म्हणे बापु । जो नाथिले नेघे ।। (अ ६-८०)

ज्याला ही बंधनाची जाणीव होते तो ती सोडून मुक्त होतो. इतकेच काय, देहाची उपाधी सुद्वा त्याला मर्यादित ठेवू शकत नाही. तो आपल्या विराट आणि सर्वव्यापी स्वरुपाशी एकरुप होतो.

नळिकेवरुनि उठला । जैसा शुक शाखे बैसला ।

तैसा मूळ अहंते वेढिला । तो म्हणौनिया ।।

अगा अज्ञानचिया निदा । जो घोरत होता बदबदा ।

तो स्वस्वरुपी प्रबद्वा । चेइला की ।। (अ. १४-३०२,३०३)

ज्ञानेश्वरांनी दिलेल्या या निरीक्षणाच्या दृष्टीने एखाद्या पोपटाचे सुद्वा दर्शन ज्ञानेश्वरी न वाचता जिचे मर्म समजावून देणारे ठरेल.

ज्ञानेश्वरीत अनेक परिचित पक्षी अध्यात्मशास्त्र आणि जगण्याची कला सांगण्यासाठी तत्पर आहेत. त्यात कोकिळ, कावळे, बगळे, घुबड हे आहेतच, त्याचबरोबर साप, भ्रमर, काजवे, बेडूक, पतंग हेही आहेत. अनेक पशु आहेत. मनुष्यस्वभावाच्या अनेक छटा ते सहजतेने उलगडून दाखवितात. साधा बगळा सुद्वा अहिंसेचा हळुवारपणा आपल्या आचरणाने स्पष्ट करतो. हे सुक्ष्म निरिक्षण बघा -

तरी तरंगु नोलांडितु । लहरी पाये न फोडितु ।

सांचलु न मोडितु । पाणियाचा ।।

वेगे आणि लेसा । दिठी घालूनि अविसा ।

जळी बकु जैसा । पाऊल सूये ।। (अ. १३-२४५, २४६)

किंवा हा भ्रमर बघा । कठीण - तर लाकडांचा भेद करणारा, पण कमळाच्या संबंधात आला की अहिंसा-व्रताचा आर्दश दाखविणारा ठरतो.

का कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हळुवार ।

कुचंबैल केसर । इया शंका ।। (अ. १३- २४७)


पक्षी-निरीक्षणाच्या संर्दभात केवळ काही दृष्टांत इथे घेतले. ज्ञानदेवांच्या या दृष्टीने जर निरीक्षण करता आले तर वृक्षशाखेवर बसलेल्या पक्ष्यांकडून ज्ञानेश्वरीच्या ओव्या ऐकायला मिळतील, वृक्षांच्या पानापानावर ओव्यांचा अर्थ लिहिलेला आढळेल; आणि लौकिक पक्षी - निरीक्षण होईल ते वेगळेच ।

# नागपूर परिसरात तुरेवाला मोठा दाबचिक

रमेश लाडखेडकर

तुर्रेबाज पाणडुबीची महाराष्ट्रातील सर्वप्रथम नोंद नागपूरच्या अंबाझरी तलावावर झाली. एका नवख्या हौशी पक्षि निरीक्षकाने ही ऐतिहासिक नोंद केली होती हे विशेष महत्वाचे. चौकस पक्षि निरीक्षणाची योग्य दखल घ्यायची म्हणून पुण्याच्या ऐकॉलीजिकल सोसायटीच्या 'जर्नल' ने या विषयाचे टिपण प्रकाशित केले. महाराष्ट्रातील सर्व पक्षिमित्रां पर्यंत ते पोचावे म्हणून ऐकॉलॉजिकल सोसायटीच्या सौजन्याने हे टिपण पुनर्मुद्रित केले आहे.

— संपादक



५ जानेवारी १९८५ ची सकाळ होती ती! गारठा चांगलाच जाणवत होता. आकाश काहीसे अभ्राच्छादित होते. पहाटे भरपूर दव पडलेले होते. तशात उत्तरेकडून येणारे थंड वारे गारठा वाढवीतच होते. नागपूर जवळच्या अंबाझरी तलावभोवतीच्या उजाड माळरानावर मी, माझे मित्र गोपाळ ठोसर व जनार्दन केवटे असे तिघे भल्या सकाळी पक्षीनिरीक्षणासाठी पोचलो होतो. खरं तर आजवर अनेकदा इथे आम्ही पक्षी-निरीक्षण केलं होतं. पण आज एखाद्या मोहीमेवर निघण्याचा उत्साह संचारला होता. कारणही तसंच होतं. केवटयांनी परवाच आम्हाला एक सुखद धक्का देणारी वार्ता दिली होती. त्यांनी सांगितलं होतं, "अंबाझरीवर मी जो पक्षी पाहिला, तो बहुधा ग्रेट क्रेस्टेड ग्रीब (तुरेवाला मोठा दाबचिक) असावा."

नागपूरच्या परिसरात या पक्ष्याची ही पहिलीच नोंद असावी.

थोडीशी शंका आणि प्रचंड उत्सुकता घेऊन हा दाबचिक पाहण्यासाठी आम्ही अंबाझरीवर आलो होतो. नागपूरच्या नैऋत्येस असलेला अंबाझरी हा तलाव तसाजुना आहे. मुळात नाग नदीच्या उगमापाशी दोन उंचवटयांमध्ये मातीचा बंधारा घालून गोंड राजांनी हा तलाव निर्माण केला. नागपूरला भोसल्यांचे राज्य असताना त्याचा बंधारा अधिक पक्का केला गेला. त्याला आजचे स्वरुप प्राप्त करुन दिले इंग्रजांनी विसाव्या शतकाच्या आरंभीच्या काळात! तलावाचा परिसर लहान टेकडया आणि मुरमाड माळरानाने व्यापला आहे. पाणलोट क्षेत्रात सुमारे ४०-५० टक्के क्षेत्र म्हणजे निम्न दर्जाचे कुरण आहे. तलावाला दलदलीची किनार फारच थोडी आहे. पाणी संपताच मुरमाड जमीन सुरु होते. पाण्याला लागून चिखलाचे पट्टे फारसे नसल्यामुळे तलावाकाठाने "वेडर्स"फार कमी संख्येने दिसतात.

पश्चिमेकडून येऊन मिळणाऱ्या मुख्य प्रवाहाच्या तोंडाशी तलाव उथळ आहे. या ठिकाणी उभ्या दांडयाचे पाणगवत वाढलेले (रिडस्) आहे मात्र 'रिडस्' चा पट्टा मोठा नाही. तलावाच्या पश्चिमेस एक औद्योगिक वसाहत आहे. बंधाऱ्याच्या उत्तर टोकाशी नागपूर महापालिकेने एक बाग तयार केली आहे. पश्चिम व दक्षिण काठांवर दोन पंपहाऊस आहेत. त्यांच्या अवतीभोवती काही झाडे प्रयत्नपूर्वक लावण्यात आली आहेत. तलावाच्या खोलगट भागात पाण्याची खोली १० ते २० फूट (३ ते ६ मीटर) असावी.

दुर्बिणीतून तलावाचा कप्पान् कप्पा न्याहाळीत आम्ही पश्चिम टोकाजवळ येऊन पोहोचलो. इथं पक्ष्यांची गर्दी दाटली होती. काही हजार कूट आणि टप्टेड, कॉमन टील, कॉमन पोचार्ड, विजन, शॉव्हेलर गार्गनी, आणि कॉटन टील या बदकांच्या प्रचंड गर्दीत आम्ही दाबचिकचा आतुरतेने शोध घेऊ लागलो. आम्ही निराश होऊ लागलो. चढते उन मानेला चटके देऊ लागले एवढयात दूर पलिकडच्या किनाऱ्यालगत एक पांढरा मोठा पक्षी बदकांच्या गर्दीत उठून दिसला. आमची उत्सुकता शिगेला पोचली. क्षणात त्या शुभ्र पक्ष्यानं पाण्यातून सरळ आकाशात झेप घेतली. त्याच्या पंखांच्या टोकाशी असलेल्या काळया 'टिप्स' दिसू लागल्या. एखाद्या शिकारी पक्ष्याच्या शिताफीने या पक्ष्याने हवेत उंची गाठली. हा काही दाबचिक नाही अशी आमची खात्री पटली. तोच तो थोराड पक्षी पाण्यावर झेपावला आणि स्थिरावला. माझ्या डोक्यात प्रकाश पडला. "अरे, हा नक्कीच गल आहे ! पण कोणता ? भराभर "पिक्टोरिअर गाइडची" पानं चाळली गेली आणि "हेरिंग गल" निश्चित झाला. "आंधळा मागतो एक..." असे आम्ही आनंदलो. कारण या पक्ष्यालाही आम्ही नागपुरात पहिल्यांदाच बघत होतो. त्याचीही ही पहिलीच नोंद असावी. १९२३ साली नागपूरच्या म्युझिअमचे क्युरेटर डी एब्यू यांनी नागपूरच्या पक्ष्यांची यादी प्रसिध्द केली आहे. या यादीत हेरिंग गल नाही. नंतरच्या कालात या पक्ष्याची नागपुरात नोंद कुणी केल्याचे आमच्या पाहण्यात आलेले नाही.

पण दाबचिक काही दिसेना. नंतर दोन तास शोधूनही तो मिळाला नाही. केवटे अस्वस्थ झाले, ओशाळले. "जाऊ द्या हो ! पक्ष्यांचं हे असंच असत; म्हणून तर पक्षी-निरिक्षणात कायम थ्रिल असतं," अशी त्यांची समजूत घालीत आम्ही "पॅक्ड लंच" संपविली. केवटयांना काम होतं म्हणून ते निघून गेले. दुपारच्या सुम्म उन्हानं मी आणि ठोसरांनी झाडाखाली चक्क ताणून दिली.

दुपारी दोनच्या सुमारास परत निघण्यापूर्वी, आम्ही समोरच्या पाणपसाऱ्यावर पुन्हा एकदा दुर्बिणी रोखल्या. आमच्या समोरच्या काठावरुन दोन पांढरे पक्षी पाण्यावर सपसप पाय वाजवीत "टेकऑफ" साठी पळत गेले. अगदी "गूज" शैलीत पंख झुलवीत खोल पाण्याकडे उडाले. लांब जाऊन पाण्यावर स्थिरावले. "शंकाच नको, हे ग्रेट क्रेस्टेड ग्रीबच !"(Poficeps cristatus) (तुरेवाला दाबचिक) आमची दोघांचीही खात्री पटली.

नंतरचे दोन-अडीच तास तलावापलिकडच्या रत्यावरली रहदारी, आमच्य आसपास माळरानावर चरणारी गुरे, चटके देणारे ऊन या कशाचेही भान आम्हाला नव्हते. तिकडे दाबचिकही उदरभरणात मग्न होते. खोल पाण्यात अन्न शोधण्यासाठी डुबकी मारुन ते अदृश्य होत, ते १००-२०० फुटांवर भलतीकडे निघत. बाहेर निघाली की मान हलवून डोक्यावरचे पाणी झटकीत. त्यावेळी त्यांच्या मानेचा, "डॅगर" सारखा आकार अनुभवाला येई. मानेची ती विशिष्ट ऐट, मोठा आकार, पांढरट, राखट रंग यामुळे बदकांमध्ये ती सहज उठून दिसत. पाण्यावर बदकांपेक्षा ती अधिक चपळ वाटली. अन्न शोधण्यासाठी ते

सतत डुबक्या घ्यायचे, बदकांच्या एका घोळक्याजवळून दुसऱ्या घोळक्याजवळ निघायचे. त्यांची गती सहज डोळयांत भरावी अशीच होती.

त्या दिवशी अंबाझरी तलावावर आम्ही चार दाबचिक नोंदविली. बहुधा दोन युगले असावीत असा आमचा पहिला अंदाज होता. त्यांच्यापैकी एक अधिक काळा-पांढरा, आकाराने मोठा, चेहऱ्याच्याभोवती पिसांची सुरेख झालर असलेला असा "डॉमिनंट मेल" असावा असं वाटलं. इतर कदाचित् पूर्ण वाढ न झालेले पक्षी असावेत. ते सर्व मिळून एक कुटुंब असावे असेही काही वेळा वाटे. वेगवेगळया ठिकाणी एकेक जोडी अधून मधून दिसे, त्यामुळे दोन स्वतंत्र युगले असावीत असे वाटे. असे बदलते तर्कमांडीत आमचे दोन-अडीच तास त्यांच्या निरीक्षणात कसे गेले कळलेच नाही.

आता उन्हं बरीच कलली होती. ढोरं परतीला लागली होती. आता परत जायला हवं असा विचार करुन मनात टिपणं करायला सुरुवात केली. माझ्यातला पक्षी-अभ्यासक जागा झाला. दाबचिकच्या डुबकीचा वेळ मोजायला लागलो. एकदा-दोनदा शंभर सेकंदावर गेलो. दोनदा तर दोनशेच्याही वर गेलो. मग मोजणे सोडून दिले. आता उतरत्या उन्हात "डिनर" जमविण्यासाठी एका मार्श हॅरिअरने चाचपणी सुरु केली. बदकांमध्ये "हलचल" सुरु झाली. काहींनी उड्डाण केलं. पाण्याखालून अचानक वर आलेल्या एका दाबचिकाने आजूबाजूला कसला गोंधळ चाललाय या आविर्भात इकडे तिकडे मान वळवून बघितलं. हॅरिअर दोनदा त्याच्या जवळून गेला. दाबचिकनं त्याची दखल घेतली नाही. जवळच्या कूटच्या थव्यावर हॅरिअर झेपावला, तेव्हा कूटस् मध्ये चांगलीच पळापळ झाली. त्यानं चिडून म्हणा, गोंधळून म्हणा, दाबचिकने एकदम घुमजाव करुन हॅरिअरकडे आक्रमक पवित्रा घेतला. कलत्या उन्हात त्याच्या डोळयांतली चमक, पिसारलेली चेहऱ्याभोवतीची झालर, आणि मानेची ऐट क्षणभर दिसली. तीनदा हॅरिएकडे वळून त्यानं हा पवित्रा घेतला. थोडया वेळाने हॅरिअरही कूटस् चा नाद सोडून निघून गेला.

अतिशय आनंदात आम्ही शहराकडे परतलो. आज आमच्या डायरीत एक ऐतिहासिक नोंद झाली होती. महाराष्ट्राच्या पक्षीसूचीत आजवर नोंदविला न गेलेला दाबचिक आम्ही नोंदविला होता.

डिसेंबर १९८६ मध्ये पक्षीगणनेच्या वेळी आमच्या चमूला तुरेवाला दाबचिक पुन्हा दिसला, यावेळी तो नागपूरच्या उत्तरेला १० कि.मी. वर असलेल्या कोराडी जलाशयात दिसला. हा जलाशय कोराडी थर्मल पॉवर स्टेशनच्या बॉयलर्सचं गरम पाणी सोडण्यामुळे तयार झाला आहे. तो १५-२० वर्षापासून इथं आहे. या तलावाच्या एका अंगाला विद्युतगृह व कर्मचाऱ्यांची वसाहत आहे. अंबाझरीपेक्षा कितीतरी जास्त या 'रीड'स्पट्ट्यात कमलपक्षी (फेझंट टेल्ड जॅसाना), पाणकोंबडया (मूरहेन्स) यामध्ये जांभळया पाणकोंबडया (पर्पल मूरहेन्स) जास्त-कूट हे पक्षी घरटी बांधतात. तलावापलिकडे कोलार नदी आणि तिच्या खोऱ्यातल्या कोळश्याच्या खाणी आहेत. तलावाच्या आसमंतात "अॅशफॉल" चे प्रदूषण जाणवते.

या तलावात एकच तुरेवाला दाबचिक दिसला आणि तोही खोल पाण्यातच वावरत होता.

अंबाझरी आणि कोराडी हे दोन्ही तलाव वाहने, माणसे, (काही शिकारी), औद्योगिक गजबज, प्रदुषण, आवाज या साऱ्यांमुळे ग्रस्त आहेत. पण वरवर पाहता पक्ष्यांवर याचा परिणाम झाल्यासारखे दिसत नाही.

जानेवारी १९८७ मध्ये काही पक्षी-निरक्षकांनी चंद्रपूर जिल्हयातल्या चारगाव तलावात चार-पाच तुरेवाल्या दाबचिकची नोंद केली. हा तलाव वरोडयाच्या (अक्षांश २०.५ उ.व रेखांश ७९ पू.) आग्नेयेस सुमारे ३० कि.मी. अंतरावर असून तो एका छोटया नदीवर धरण बांधल्याने तयार झालेला आहे. याला सर्व बाजूंनी शेतीने वेढले आहे. पाण्याच्याजवळ पाणगवताचा पट्टा इथेही आहेच. तलावात भरपूर गाळ साचल्याचे पाणी उथळ आहे. इथे पाणपक्ष्यांची विविधता पहायला मिळते. गेल्या दोन वर्षात इथे क्रौंच (दमॉसेल क्रेन), राजहंस (बारहेडे गूज), करकोचे (पेन्टेड स्टॉर्क) यांची नोंद झाली आहे. याही तलावात तुरेवाले दाबचिक बांधाजवळच्या खोल पाण्यात, रहदारीची फारशी दखल न घेता वावरताना आढळले.

फेबुवारी १९८७ मध्ये मला एक तुरेवाला दाबचिक दिसला. तो पुन्हा अंबाझरी तलावात.

गेल्या काही वर्षात तुरेवाला दाबचिक विदर्भाच्या बऱ्याच मोठया भौगोलिक क्षेत्रावर स्थलांतरीत होऊ लागला आहे

असे वाटते. उत्तरेकडून येणारे पक्षी विंध्य व सातपुडा पर्वत ओलांडून, मध्य प्रदेशातून पूर्व विदर्भात वैनगंगेच्या खोऱ्यात नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली आदी जिल्हयात उतरत असावेत (नकाशा पहा)


गुजरातमध्ये गेली ३ वर्षे सतत अवर्षण असल्याने तळी कोरडी पडली आहेत. तेथून हे पक्षी कदाचित् तापी नदीच्या खोऱ्यातून पश्चिम विदर्भात येत असावेत. संपूर्ण प्रदेशातील तलावांवर लक्ष ठेवणे जरुर आहे. पक्षी-निरीक्षकांना ते एक आव्हानच आहे.


तुरेवाला दाबचिक विदर्भात स्थिरावतो का, हे पाहण्यासाठी त्याची अनेक वर्षे नोंद ठेवली पाहिजे. काही विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीत स्थलांतरीत झालेला हा पक्षी, या भागातला एक नेहमीचा स्थलांतरीत पक्षी म्हणून गणला जाण्यासाठी कोणते घटक कारणीभूत ठरु शकतात ? दरम्यान या पक्ष्याच्या सवयींमध्ये काही परिवर्तन घडून येते का ? बदललेल्या सवयी पिढयांमध्ये संक्रमित होतात का ? रहिवासी पक्षी, कायम स्थलांतरीत पक्षी यांच्याशी या नव्या स्थलांतरीतांचे संबंध कसे असतात ? असे संशोधन मग या अनुषंगाने करणे शक्य आहे.

**संदर्भ :**


अली सलिम, रिप्ले डिलन, १९८३ : ए पिक्टोरिअर गाइड टू दी बर्डस् ऑफ दी इंडियन सब-कॉन्टिनंट, बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, नवी दिल्ली.

द एब्यू. इ.ए. १९२३ : ए हॅन्ड-लिस्ट ऑफ दि बर्डस् ऑफ दी सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस, रेकॉर्डस् ऑफ दी नागपूर म्युझिअम, नं ३ गव्हर्नमेंट प्रेस, नागपूर.



# निसर्ग सेवा संघ – परिचय

## पदाधिकारी

अध्यक्ष
श्री. सी. एस. किरपेकर

कार्यवाह
श्री. रमेश लाडखेडकर

कार्याध्यक्ष
डॉ. श्री. म.भा. निसळ

सहकार्यवाह
श्री प्रद्युम्न सहस्त्रभोजनी

संचालक : श्री. प्रकाश गर्दे, श्री. दा.द. झाडे श्री. प्रतापराव लिमसे

**वाटचाल :**

एका आशावादी चिंतनाची शिदोरी सोबत घेऊन आम्ही वाटचाल सुरु केली आहे. उद्याचं जग मानव आणि निसर्ग यांच्यातील सुसंवादाचं जग असेल अशी आमची धारणा आहे. मात्र त्यासाठी पृथ्वीवरल्या सृष्टीची नव्यानं उभारणी करण्यास आणि माणसाचं मन आणि त्याच्या समाजाची नव्या मूल्यांवर आधारित रचना करण्याचं व्रत स्वीकारावं लागणार आहे.

'माणूस निसर्गपुत्र आहे. निसर्गातील अन्य सजीव सहोदरांचे व त्यांना धारण करणाऱ्या सृष्टीचे संरक्षण करणे हे त्याचे कर्तव्य आहे ही सनातन भारतीय संस्कृतीची धारणा आहे. या मूल्यावर आधारित सृष्टीशी समन्वय राखणाऱ्या आधुनिक भारतीय समाजाची उभारणी व्हावी' हे ध्येय उराशी बाळगून निसर्ग सेवा संघाची वाटचाल सुरु झाली आहे. निसर्ग सेवा संघ हा सामान्य लोकांचा एक मोठा संकल्प आहे.

संकल्पपूर्तीसाठी निसर्ग सेवा संघाने ग्रीन मूव्हमेन्ट व व्हीएनएचएस सेन्टर या दोन विभागांची रचना केली आहे.

**व्ही एन एच एस (विदर्भ नॅचरल हिस्टरी स्टडी) सेंटर**

निसर्गसमृध्द विदर्भाच्या निसर्गविषयक माहितीचे संकलन, अध्ययन, संशोधन, प्रकाशन तथा प्रसारण हे व्ही एन एच एस चे उद्दिष्ट आहे. यासाठी विविध उपक्रमांचे सेंटरच्या अंतर्गत आयोजन सुरु आहे.

**ग्रीन (गांधीयन रिव्हायव्हल ऑफ अर्थ एनव्हिरॉमेन्ट) मूव्हमेन्ट**

सिर्ग संरक्षण, संगोपन तथा संवर्धन यासाठी जनशिक्षण व जनजागरण अभियान तथा लोक चळवळीचे संघटन हे ग्रीन मु्व्हमेन्टचे उद्दिष्ट आहे. यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन सुरु आहे.

# विदर्भ नॅचरल हिस्ट्री स्टडी (VNHS) सेंटर - एक संकल्पना

प्रकाश गर्दे

महाराष्ट्रातील निसर्गप्रेमींना विदर्भातील निसर्गाची तोंड ओळख मेळघाट व्याघ्र-प्रकल्प, ताडोबा, नवेगांव-बांध, नागझिरा, पेचं, बोर इत्यादी ठिकाणची राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्यें यांना दिलेल्या भेटीतून किंवा त्याविषयी प्रसिध्द झालेल्या साहित्यातून झालेलीच आहे. विदर्भात असलेली समृध्द वनश्री आणि वन्य जीवनातील वैविध्य यामुळे विदर्भाला आज निसर्ग प्रेमींच्या दृष्टीने विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आले. हे मध्यभारतातील प्राणी फार पूर्वीपासून लोकांना - यामध्ये शिकाऱ्यांचाच समावेश अधिक असे - आपल्याकडे आकर्षित करीत आलेले इंग्रजांचे शिकारीचे वेड सर्वश्रुतच आहे. त्यांनी नागपूरला **"गेट वे टू सेन्ट्रल इंडियन फॉरेस्ट्स"** असे नांव बहाल केले होते. आपला राष्ट्रीय प्राणी पटटेवाला वाघ अख्खया महाराष्ट्रात केवळ विदर्भातच अस्तित्वात आहे ही गोष्ट विदर्भातील जंगलाच्या स्वास्थ्याचीच ग्वाही देते.

विदर्भात जशी दाट जंगले आहेत तशीच गवताळ माळरानेही आहेत. उंच डोंगर-टेकडया, दऱ्या -खोऱ्या आणि कडे-कपारींनी व्यापलेला प्रदेश आहे तसेच नदी-नाल्यांनी युक्त असा सुपीक सपाट प्रदेश आणि पाणथळ जागाही आहेत. अतिपर्जन्याचा प्रदेश आहे तसेच दुष्काळी, शुष्क प्रदेशही आहे. थोडक्यात विदर्भात सर्व प्रकारच्या पर्यावरणीय व्यवस्था (इको सिस्टम्स) अस्तित्वात आहेत. परिणामी, विदर्भात विविध प्राणी, पक्षी आणि वनस्पतींनी समृध्द असा निसर्ग आहे.

संपन्न, स्वस्थ जंगलांच प्रतीक समजला जाणारा पट्टेवाला वाघ येथे आहे, स्वस्थ पाणथळ जागांचं प्रतीक असा सारस येथे आहे आणि स्वस्थ गवताळ प्रदेशाचं प्रतीक असा माळढोक आणि त्याच जातीचा तणमोरही येथे आहे. उत्तरेकडील भागात अवर्षणामुळे पाणथळींचा तुटवटा भासल्यास तेथे येणाऱ्या परदेशी पाहूण्यांना (स्थलांतरीत पक्ष्यांना) निवारा देऊ शकण्याची क्षमता असलेला निसर्ग विदर्भात आहे. सपाटयाने कमी होण्याऱ्या 'बार-हेड' बदकांना विदर्भ आपलासा वाटतो, तसेच मोठया तुरेवाल्या 'दाबचिक'ने पण आपली दक्षिणेकडील सीमा म्हणून विदर्भातील तळी निवडली आहेत.

अशा सर्व दृष्टींनी समृध्द असलेल्या विदर्भात निसर्गावलोकनास मात्र त्यामानाने उशीराच सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. पंधरा - एक वर्षापूर्वी नागपूरात पक्षी-निरीक्षकांची संख्या मोजकीच होती. त्या सुमारास श्री. प्रकाश गोळे यांच्या सोबत नवेगावला दिलेल्या भेटीनंतर श्री. रमेश लाडखेडकरांनी आणि मी नागपुरात आणि आसपास पक्षी-निरीक्षणास सुरुवात केली. हळुहळू काही जवळचे मित्र ही या छंदात सहभागी झाले. आम्ही सगळेच नवशिके असल्याने आम्हाला निरनिराळया अडचणी यायच्या आणि पदोपदी मार्गदर्शनाची गरज भासायची. पण असे मार्गदर्शन सहजी मिळत नव्हते. अनेक प्रश्न, शंका समोर येत आणि त्यांची उत्तरे शोधण्यासाठी आम्हाला फार प्रयास करावे लागत. या विषयावरील पुस्तकं मिळणं, त्यात हवा तो संदर्भ मिळणं हे सर्व जरा कठीणच असायचं पुस्तकं मिळाली तरी त्यात आमच्या शंकांची नेमकी उत्तरं मिळत नसत. विशेषतः पक्ष्यांच्या सवयी किंवा वागणुकी विषयी विस्तृत माहिती अशा पुस्तकात मिळत नसे. आम्ही केलेली निरीक्षणं ही त्या विशिष्ट पक्ष्याच्या वहिवाटीनुसारच होती किंवा नाही हे ताडून पाहणे शक्य होत नसे.

या सर्वातून एक गोष्ट प्रकर्षाने लक्षांत आली की अनेक पक्ष्यांच्या बाबतीत त्यांच्या सवयी, लकबी, त्यांचे खाद्य, राहण्याच्या जागा, त्यांनी व्यापलेला प्रदेश इत्यादिं विषयी पुस्तकांमध्ये फार ढोबळ मानाने उल्लेख केलेला आहे. या संदर्भात डॉ. सलीम अलींनी नमूद केलेच आहे की अजूनही बऱ्याच पक्ष्यांविषयी चे ज्ञान अपूर्णच आहे. इतर पक्षी मित्रांशी चर्चा करताना त्यांच्याही मनात अनेक शंका व प्रश्नचिन्हे असल्याचे जाणवले. अशा शंकांचा आणि प्रश्नांचा पाठपुरावा केल्यास, त्या प्रयत्नातून बरीच नवीन माहीती मिळू शकेल या विचारापोटी - अशा निरीक्षणांची नोंद व्हावी, पक्षीमित्रांच्या अनुभवांची देवाण-घेवाण व्हावी, त्यावर चर्चा व्हावी या उददेशाने आम्ही एक द्वैमासिक पत्रक 'नेचर न्यूज' या नावाने सुरु केले होते. त्याचा पहिला अंक डॉ. सलीम अली यांच्या हस्ते औरंगाबाद येथील पक्षीमित्र संमेलनात प्रसिध्द करण्यात आला होता. परंतु निसर्ग प्रेमींकडून पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने हा प्रयत्न फार काळ तग धरु शकला नाही.

पक्ष्यांविषयी माहितीतील उणीवा जशा आम्हाला जाणवल्या तसेच हेही लक्षात आले की वनस्पती आणि

वन्य-जीवनाविषयी इतर काही प्रदेशांचा - जुन्या राजवटीतील संस्थानांचा यात समावेश होतो - जसा पध्दतशीर सर्व्हे करण्यात आला होता तसा बहुधा विदर्भाचा झाला नसावा. विदर्भात माळढोकाच्या अस्तिवाची नोंद वनखात्याच्या तसेच बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्याही दप्तरी नसावी यावरुन आमच्या अनुमानाला पुष्टीच मिळते. या संदर्भात काही प्रगती व्हायची असल्यास विदर्भातील निसर्ग प्रेमींनीच पुढाकार घेणे आवश्यक होते.

पुढे जेव्हा आम्ही निसर्ग सेवा संघाच्या उभारणीचा विचार करु लागलो तेव्हा विदर्भात निसर्गाचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास व्हावा, त्यासाठी हौशी निसर्ग प्रेमींना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळावे या उददेशाने निसर्ग सेवा संघाचा एक विभाग या कार्यासाठी असावा असे ठरले. शिवाय निसर्गविषयक माहितीचे संकलन, अध्ययन, शोध, प्रकाशन आणि प्रसारण व्हावे हाही महत्वाचा उददेश या पाठीमागे होता. डॉ सलीम अलींचा आदर्श समोर ठेवून आणि त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांच्या जन्मदिनी म्हणजेच १२ नोव्हे. १९८७ रोजी विदर्भ निसर्ग इतिहास अभ्यास केंद्राची (विदर्भ नॅचरल हिस्ट्री स्टडी सेंटर व्ही.एन.एच.एस. सेंटर) स्थापना करण्यात आली. इथे अभिमानाने नमूद करावेसे वाटते की नागपूरला झालेल्या दुसऱ्या पक्षीमित्र संमेलनातील ठरावा प्रमाणे १२ नोव्हें. हा डॉ. सलीम अलींचा जन्मदिवस **"पक्षी-दिन"** म्हणून दरवर्षी साजरा करण्याची प्रथाही निसर्ग सेवा संघानेच घालून दिली.

आज पर्यंतच्या व्ही. एन.एच. सेंटरच्या कार्याचा आढावा ध्यायचा झाल्यास पुढील गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

**१) संदर्भ ग्रंथालयाची स्थापना :-**

निसर्ग विषयक संदर्भ ग्रंथ, संशोधनपर साहित्य प्रोजेक्ट रिपोर्टस, ललित साहित्य नियत कालिकं तसेच दृकश्राव्य चित्रफिती, पारदर्शिका इत्यादिंनी युक्त असे ग्रंथालय स्थापन करण्यात आले आहे यात आजवर सुमारे ७०० पुस्तकं, ८ ते १० प्रकारची नियत कालिकं, २० चित्र फिती आणि अनेक पारदर्शिकांचा संग्रह करण्यात आला आहे.

**२) पक्षी-सूची (चेक लिस्ट) :-**

व्ही.एन.एच.एस सेंटरच्या संस्थापन दिनाच्या निमित्याने आणि आमच्या तोवरच्या कार्याची नोंद व्हावी या उददेशाने आम्ही १२ नोव्हें १९८७ रोजी नागपूर व आसपास आढणाऱ्या पक्ष्यांची एक सुची (चेक लिस्ट) प्रकाशित केली. यात अंदाजे १९ समूहातील (ऑर्डर्स) ९० कुटुंबात (फॅमिलीज) विभागलेल्या २१७ प्रकारच्या पक्ष्यांचा समावेश आहे. संपूर्ण विदर्भाचीही अशीच पक्षी-सूची तयार करण्याचा आमचा संकल्प आहे. निसर्ग प्रेमींच्या सहकार्याने हे काम लवकरच पूर्ण होईल अशी आशा वाटते. या पक्षी-सूचीत इंग्रजी नावांबरोबरच स्थानिक मराठी नावांचाही उल्लेख असेल. तसेच शक्य झाल्यास काही पक्ष्यांची रेखाटनेही देण्याचा प्रयत्न राहील.

**३) पाणपक्षी गणना :-**

व्ही.एन् एच एस् सेंटरच्या स्थापनेपूर्वीच आम्ही आय. डब्ल्यू.ए च्या वतीने पाणपक्षी गणनेत सहभागी झालो होतो. १९८८ सालापासून व्ही एन एच् एस् सेंटरच्या कक्षेत हे काम घेण्यात आले आहे. प्रथम जरी नागपुरला व आसपासच्या तळयांवर पक्षीगणना केली गेली तरी पुढे निसर्ग प्रेमिंच्या सहकार्याने विदर्भातील इतरही तळी या वार्षिक गणनेत समाविष्ट करण्यात आली खालील तक्त्यावरुन आतापर्यंतच्या कामाचा आढावा घेण्यात येईल.

| वर्ष | तळयांची संख्या | मोजणयात आलेल्या पाणपक्ष्यांचे प्रकार (संख्या) | पक्षांची एकूण संख्या |
|---|---|---|---|
| १९८७ | ३ | ३८ | ६२२२ |
| १९८८ | ६ | ४९ | १२०९६ |
| १९८९ | ९ | ५० | १०७० |
| १९९० | २८ | ५७ | १०८४७ |
| १९९१ | २६ | ५९ | ७८८८ |
| १९९२ | २२ | ६५ | १६१७० |
| १९९३ | २६ | ७० | १८७२८ |

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने १९८९ सालापासून विदर्भातील पाणपक्षी गणनेच्या सूत्रसंचालनाचे आणि समन्वयाचे काम निसर्ग सेवा संघावर सोपविले आहे.

**४) विदर्भातील क्रौंच शोध :-**

दिल्लीत १९८६ साली झालेल्या इंडीयन क्रेन वर्किंग ग्रुप कॉन्फरन्सच्या निर्णयानुसार विदर्भात क्रौंच पक्ष्यांच्या शोध घेणे, त्यांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे या उददेशाने १९८८-१९८९ मध्ये विदर्भात दौरा करुन क्रौंच पक्ष्यांचा शोध घेण्यात आला. या पाहणीत काही उल्लेखनीय गोष्टी उजेडात आल्या त्या अशा :-

**अ) कॉमन क्रेन :-**

हा आधी विदर्भात नोंद न झालेला पक्षी १९८७ मध्ये मेळघाटच्या जंगलात आणि १९८८ मध्ये चारगावच्या तलावार (चंद्रपूर जिल्हा) दिसला आम्ही याची एक दुर्मिळ हिवाळी पाहुणा म्हणून नोंद केली आहे.

**ब) दमवाझेल क्रेन :-**

हा पक्षी १९८५ ते १९८८ या काळात दरवर्षी अकोला आणि चंद्रपूर जिल्हातील मोठया तलावांवर नियमितपणे दिसला. त्याची संख्याही वाढत असल्याचं तीन वर्षाच्या चारगाव तलावावरील नोंदीवरुन दिसतं यावरुन हा पक्षी विदर्भात मोठया संख्येने येत असावा आणि सर्वदूर पसरत असावा.

**क) सारस :-**

नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्हांचा सर्व्हे केल्यावर प्रत्येक ठिकाणी सारस अस्तित्वात असल्याचं आणि घरटीही करीत असल्याचं प्रस्थापित झालं सारसला राहण्यायोग्य पाणथळ जागा/ परिसर असूनही मानवी हस्तक्षेपामुळे अशा परिसराचे झपाटयाने होणारे आकुंचन आणि त्याच्या संरक्षणा संबंधीची शासन आणि स्थानिक लोकांची उदासीनता यामुळे सारसांची संख्या बरीच कमी झाली असावी. एकटया नवेगांव परिसरात सारसांची एकूण संख्या गेल्या १० वर्षात ३० टक्क्याने तर प्रजननक्षम जोडप्यांची संख्या ५० टक्कयाने कमी झाल्याचं दिसून आलं.

क्रौंच पक्ष्यांच्या या पाहणीचा अहवाल इंडियन क्रेन वर्किंग ग्रुपला सादर करण्यात आला आहे. या पाहणीच्या दुसऱ्या टप्प्यातील कार्य निसर्ग प्रेमींच्या सहकार्याने चालू आहे.

**५) विदर्भ माळढोक शोध प्रकल्प :-**

विदर्भात मालढोकाच्या अस्तित्वाचा अलीकडील कुठलाच पुरावा किंवा नोंद सरकार दप्तरी तसेच बी एन् एच् एस् कडे ही उपलब्ध नसताना आणि श्री धर्मकुमार सिंग सारख्यांच्या "विदर्भातून 'माळढोक' नाहीसा झाला असावा" अशा अभिप्रायाच्या पार्श्वभूमीवर, १९८२ साली मिळालेल्या माहितीचा पध्दतशीरपणे पाठपुरावा करुन नागपुरहून केवळ १५ कि.मी. अंतरावर 'माळढोक' शोधून काढण्यात आम्हाला यश आले. भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती आणि अकोला या

जिल्हयांमध्येही माळढोकांच्या अस्तित्वाच्या बातम्या हाती आल्या आहेत. या बातम्यांची शहानिशा करणे, विदर्भातील माळढोकांचे स्थान (स्टेटस) निश्चित करणे, त्याचे संरक्षण व संवर्धन या संबधी लोकजागृती करणे त्याच्या पर्यावरणीय व्यवस्थेचा अभ्यास करणे इत्यादी उददेशाने विदर्भ माळढोक शोध प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. निसर्ग प्रेमींच्या सहकार्याने हा प्रकल्प ही यशस्वी होईल अशी आम्हाला खात्री आहे.

विदर्भ निसर्ग इतिहास अभ्यास केन्द्रा व्दारे शास्त्रीय दृष्टीकोनातून विदर्भात निसर्ग अभ्यासास अशा रितीने चालना मिळाली आहे. अशा अभ्यासा बरोबरच पर्यावरणीय समस्यासंबधी सामान्य जनतेस जागृत करण्यासाठी तसेच निसर्ग संरक्षण आणि संगोपना विषयीच्या योजना सफल होण्यासाठी नितांत आवश्यक असलेले लोकशिक्षण आणि जन-मत निर्मिती या गोष्टींकडे सुध्दा दुर्लक्ष करुन चालणार नाही. या बाबतीत सुध्दा निसर्ग सेवा संघ सतत जागरुक आहे.

व्हि.एन.एच. एस. सेंटर हे निसर्ग विषयक ज्ञानार्जना साठी हौशी निसर्ग प्रेमी आणि अभ्यासकांच्या गरजा भागवू शकणारे तसेच अधिक प्रगत संशोधनासाठी मूलभूत प्रशिक्षण देऊ शकणारे एक लोकाभिमुख खुले विद्यापीठ व्हावे, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी प्रमाणेच मध्य भारतात व्हि एन् एच् एस् सेंटरचे कार्य सर्वमान्य व्हावे असा निसर्ग सेवा संघाची महत्वकांक्षा आहे. हे उध्दीष्ट गाठणे सोपे नाही, त्यासाठी अतोनात परिश्रमांची गरज आहे हेही तितकेच खरे.

हा सामान्य माणसांचा एक असामान्य प्रयत्न आहे. बिजारोपण झालेच आहे. हे रोपटे वाढवून त्याचा सुदृढ डेरेदार वृक्ष होण्यासाठी सर्वांच्याच सहकार्याची गरज आहे.

---


**यावत् भूमंडळात् धत्ते सशैल वनकाननम् ।**
**तावत् तिष्ठंति मेहिन्याम् संतती पुत्र पौतृकी ॥**

**वराह पुराण**

**(जोपर्यंत या जगात, या धरतीवर पर्वत, वने, उद्याने, सरोवरे आहेत, तोपर्यंत तुमची मुलेबाळे, नातवंडे सुखाने नांदतील.)**



**WITH COMPLIMENTS FROM**

MODERN CONSTRUCTIONS NAGPUR

MAHAVIR CONSTRUCTIONS NAGPUR

M/s. DURGA CONSTRUCTIONS NAGPUR

J.W. Hiwale, Civil Contractors AMRAVATI

(वनराईच्या सौजन्याने)



आता वेळ आलीय धरतीवर प्रेम करारयची
तिच्या कुशीत शिरायची, जिने आपल्याला जन्म दिला ॥
आता वेळ आलीय सागरांना स्वच्छ करायची ॥

हवेला शुध्द करायची, झाडांना वाचवायची ॥
जरा लक्ष देऊन आपल्या हृदयाचे स्पंदन ऐका ॥
एक नवीन सुरुवात करायला बळ मिळेल ॥

त्यातूनच एक नवी आशा, नवी ताकद जन्म घेईल ।
पुन्हा स्वप्नं पाहण्याची, पुनः पुन्हा स्वप्न जगण्याची ॥
हे सर्व जग एक घरकुल, आपणा सर्वांचे एकच ध्येय ॥
अजून वेळ गेलेली नाही, जखमा भरून येतील
आनंदोत्सव सुरु होईल ॥

**NIPPON DENRO ISPAT LIMITED**

**CENTRAL MARKETING OFFICE :**

'Poonam Plaza,' Palm Road,
Civil Lines, Nagpur - 440 001
Phone : 525750, 525742, 520132
Telex : 0715426 NDIL IN

स्वतःला इतरांपेक्षा वेगळे, स्वतंत्र अस्तित्व
देण्याचा आपण कितीही प्रयत्न करीत असलो, तरी,
संपूर्ण मानवजातीतील मूलभूत एकात्मतेची जाणीव
आपल्याला निसर्ग स्वतःच करुन देत असतो. अनेक
महान तत्त्वचिंतकांनी गौरविलेली आणि श्रेष्ठ अशा सर्व
धर्मांच्या मुळाशी असलेली एकात्मतेची संकल्पना ही
आता अपरिहार्य अशी वस्तुस्थिती बनली आहे. ऐक्य
आणि सहकार्याची ही जाणी जनमानसात रुजविणाऱ्या
संस्था-संघटना पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र निर्माण करण्याचे
काम आजची तरुण पिढी करेल का ?



**L.S. ENGINEERING SERVICES**

87, Canal Road,
Ramdaspetth, Nagpur - 440 010
Phone : 525669

माहिती दिली. पारंपारिक समजुतींना धक्के देत श्री. चितळे यांनी साधार माहिती सादर करुन रामटेकविषयी असलेल्या गैरसमजुती दूर केल्या.

**समापन सत्र**

पर्यावरणाचे संतुलन किती ढासळले आहे याचा अनुभव शिबिरार्थींना रामटेक येथे आला. मे महिन्याच्या मध्यात जेथे कडक ऊन पडायला हवे तेथे पावसाने झड लावली होती. भर उन्हाळयात पावसाळयाचा भास होत होता. रामटेकच्या टेकडया अवेळी पडणाऱ्या पावसाकडे कुतुहलाने पहात होत्या. पक्ष्यांनी चकित होऊन घरट्यातच स्थान मांडल्याने पक्षी-निरीक्षण म्हणावे तसे करता आले नाही. बंद हॉल मध्ये कार्यक्रम पार पाडावे लागले. शिबिराच्या समारोपप्रसंगी शिबिरार्थींनी आपाले मनोगत व्यक्त केले. शिबिरातील व्यवस्था व उपक्रम-मार्गदर्शन या विषयी त्यांनी समाधान व्यक्त केलेच पण पर्यावरणाचे संदर्भात आपण आपल्यापरीने प्रयत्नशील राहू असे अभिवचन त्यांनी या प्रसंगी दिले. शेवटी शिबिरार्थींना निसर्ग सेवा संघाच्या ग्रीन मूव्हमेंटच्या प्रमुख सौ. अनुराधा लाडखेडकर यांचे हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली व सत्र संपल्याचे घोषित करण्यात आले. भावी पिढीच्या भवितव्याशी निगडीत असलेल्या पर्यावरण प्रश्नाचे संदर्भात ढाल होऊन आपल्याला काम करावयाचे आहे. ही प्रेरणा शिबिरातून मिळाली.

हे शिबिर यशस्वी करण्यात निसर्ग सेवा संघाचे कार्यवाह श्री. रमेश लाडखेडकर, सौ. अनुराधा लाडखेडकर पर्यावरण शिक्षक मंचाचे संचालक श्री. अशोक कुईडकर, निसर्ग अभ्यास केन्द्राचे श्री. दामोदर झाडे, श्री. रवि देशपांडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या शिबिरात सात शाळांमधील वीस शिक्षक सहभागी झाले होते.

**प्रशिक्षण अभियान**

निसर्ग सेवा संघ हा निसर्गप्रेमी लोकांचा एक छोटासा परिवार आहे. सामाजिक बांधिलकीची जाण ठेवून निसर्ग संवर्धन व संरक्षण करण्याचे कार्य संघाने अंगीकारले आहे. शासन वा अन्य कुणाहीकडून आर्थिक मदत न घेता स्वबळावर निसर्ग संरक्षणाचे कार्य करणारी ही एकमेव संस्था आहे. निश्चित उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून योजनाबध्द प्रयत्नांच्या माध्यमातून पर्यावरण प्रश्नाच्या सोडवणुकीला सामाजिक चळवळ करण्याचा संकल्प संघाने सोडला आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग संस्कार रुजविण्याचे हेतूने कार्यकर्ता शिक्षक तयार व्हावा म्हणून पर्यावरणविषयक नियोजित अभ्यासक्रम प्रसिध्द शिक्षणतज्ञ डॉ. विभावरी यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात येत असून येत्या जुलै महिन्यापासून त्यांचे वर्ग निसर्गसेवा संघाच्या माध्यमातून गांधी स्मारक निधीच्या सौजन्याने कस्तुरबा भवन बजाजनगर नागपूर येथे सुरु होत आहे. नव्या शिक्षण प्रणालित पर्यावरण शिक्षणास प्राधान्या अभिप्रेत आहे. यासाठी शिक्षकांच्या पर्यावरणविषयक प्रशिक्षणाचा व्यापक कार्यक्रम आवश्यक राहणार आहे. या कार्यक्रमासाठी स्वयंप्रेरणेने शिक्षकांसाठी राबविलेला उपक्रम असे या अभियानाचे स्वरुप आहे. शिक्षकांचा आत्मसन्मान वाढविणाऱ्या या प्रशिक्षण अभियानात त्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आम्ही करीत आहो. निसर्ग हे एक दर्शन आहे. त्याग हा त्याचा आधार आहे. सर्वाभूती समानता ही त्याची वृत्ती आहे. सौंदर्य हे त्याचं रुप आहे आणि आनंद हा त्याचा परिणाम आहे. हे सर्व निर्माण व्हावं, जीवन संपन्न करण्याचे माध्यम असलेल्या निसर्गाचा मानवाने नाश करु नये, तर सुसंवाद साधला पाहिजे, ही धारणा उराशी बाळगून कार्यरत निसर्ग सेवा संघ पर्यावरणाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीतील एक महत्त्वाचे माध्यम ठरु पाहात आहे.

